## प्रकरण चौथे

### ऊसतोड कामगारांची सामाजिक आर्थिक सद्य:स्थिती

४.१ प्रास्ताविक

४.२ रोजगार, वेतन व कामगार संघ विषयक स्थिती

४.३ ऊसतोड कामगारांची आर्थिक सद्य:स्थिती

४.४ राहण्याची व्यवस्था, शिक्षण व आरोग्यविषयक स्थिती

## प्रकरण चौथे

## ऊस तोड कामगारांची सामाजिक-आर्थिक सद्य:स्थिती

### ४.१ प्रास्ताविक :

या प्रकरणामध्ये ऊस तोड कामगार कुटुंबाच्या सामाजिक आर्थिक सद्य:स्थितीचे पृथक्करण केले आहे. हे पृथक्करण खालील प्रमाणे (सर्वेक्षणासाठी वापरलेल्या प्रश्नावली प्रमाणे) तीन विभागात केलेले आहे.

१) रोजगार, वेतन व कामगार संघविषयक स्थिती.
२) उत्पन्न व खर्चविषयक स्थिती.
३) राहण्याची व्यवस्था, शिक्षण व आरोग्यविषयक स्थिती.

` वसंत (दादा) शेतकरी सहकारी साखर कारखाना लि., सांगली ` कार्यक्षेत्रामध्ये ऊस तोडणीचे काम करणाऱ्या कामगारांचे सर्वेक्षण नोव्हेंबर-डिसेंबर, १९९० मध्ये केलेले आहे. या सर्वेक्षणामध्ये ९० ऊस तोड कामगारांची प्रश्नावलीच्या सहाय्याने मुलाखत घेऊन जी प्रत्यक्ष माहिती जमा केलेली आहे, त्याच्या आधारावर या कामगारांच्या सामाजिक आर्थिक सद्य:स्थितीचे पृथक्करण केलेले आहे. नमुना पाहणी ऊस तोडणीचे काम सुरू असणाऱ्या ऊसाच्या शेतावर जाऊन व ऊस तोड कामगारांना प्रत्यक्ष भेटून केलेली आहे.

### ४.२ रोजगार वेतन व कामगारसंघविषयक माहिती :

या विभागात खालील मुद्यांचे विश्लेषण केले आहे.

१) रोजगारीचे स्वरूप व सर्वसाधारण माहिती.
२) कामाचे तास, सुट्टी व विश्रांती.
३) नुकसान भरपाई.
४) कामातील सुधारणा होण्याबाबत अपेक्षा.

५) वेतन दर व वेतन भिन्नता.

६) सोयी-सवलतींची उपलब्धता.

७) कामगार-मालक संबंध.

८) कामगार संघटना स्थिती.

४.२.१ रोजगारीचे स्वरूप व सर्वसाधारण स्थिती -

ऊस तोड कामगार हे कारखान्याचे कामगार नाहीत तर ते कंत्राटी कामगार आहेत. कारखान्यात त्याना हंगामी कामगार म्हणून ओळखतात. ऊस तोड कामगारांची भरती कारखान्याकडून केली जात नाही. परंतु गळीत हंगामात गरजे इतपत कामगार उपलब्ध व्हावेत म्हणून अप्रत्यक्षपणे तरतूद केली जाते. शिवाय त्यांचा कामाचा मोबदला किती द्यावा हेही कारखाना ठरवून देत असतो. ऊस तोड कामगार कंत्राटी कामगार असल्याने त्यांची भरती कंत्राटदारांच्याकडून केली जाते. कंत्राटदारांच्याकडून मिळालेल्या माहितीनुसार येथे असे नमूद करता येईल की, गळीत हंगामाच्या सुरूवातीस कारखान्याकडून कंत्राटदारांना ३५००० रूपयांपर्यन्त उचल मिळते. यापैकी १८००० रूपये वाहन दुरूस्ती व १७००० रूपये ऊस तोड कामगारांना उचल देण्यासाठी असतात. कंत्राटदार मुकादमांची नेमणूक करतात. ऊस तोडणीसाठी मिळालेली उचल कंत्राटदार मुकादमांच्याकडे देतात. मुकादम आपआपल्या गावात त्याच्या परिचयाचे व ऊस तोडणीच्या कामावर येण्यास तयार असणाऱ्या मजुरांची मिळून एक टोळी बनवितो. एका टोळीत १५-१६ कोयते असतात. प्रत्येक कोयत्या पाठीमागे गळीत हंगामाच्या सुरूवातीस सर्वसाधारणपणे १००० रूपये उचल देऊन मजूर निश्चित केले जातात. अशारीतीने ऊस तोडणी कामगारांची भरती मुकादम व कंत्राटदार यांच्या मध्यस्थीने होत असते.

उत्तरदात्यांच्याकडून मिळालेल्या माहितीनुसार हे कामगार सतत गेली १५ ते २० वर्षे प्रतिवर्षी ऊस तोडणीच्या कामावर येत आहेत. काही वेळेला त्यांचे मुकादम व कंत्राटदार बदलतात, परंतु हे मात्र कामावर येत असतात अशी

स्थिती असून ही अजून तरी साखर उद्योगातील ऊस तोडणी कामगार कायम झालेले नाहीत. त्यांच्या रोजगारीचे स्वरूप एकूण कंत्राटी व हंगामीच आहे.

ऊस तोड कामगारांच्या एकूण रोजगारीच्या स्थितीचा विचार करता असे दिसते की, कारखान्याच्या गळीत हंगामाच्या काळात पूर्ण रोजगारीची व हंगामेत्तर काळात अपूर्ण रोजगारीची स्थिती असते. साखर कारखान्यांचा गळीत हंगामाचा काळ साधारणत: नोव्हेंबर ते मे अशा ६ ते ७ महिन्यांचा असतो. १९८९-९० चा गळीत हंगाम याहीपेक्षा अधिक आहे. परंतु हंगामेत्तर काळात त्यांच्या रोजगारीची स्थिती व स्वरूप कसे असते, हे कोष्टक क्रमांक ४.१ मध्ये दाखविले आहे.

कोष्टक क्र. ४.१

एकूण रोजगारीच्या स्थितीनुसार उत्तरदात्यांचे वर्गीकरण

| रोजगारीचा मार्ग | रोजगारीचा कालावधी | उत्तरदात्यांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| अ) गळीत हंगाम<br>१) ऊस तोडणीचे काम | नोव्हेंबर ते मे | ९० | १००.०० |
| ब) हंगामेत्तर काळ | जून ते ऑक्टोबर | | |
| २) स्वत:ची शेती व काही प्रमाणात दुसऱ्याच्या शेतावर रोजंदारी करणे | ,, | ७२ | ८०.०० |
| ३) पूर्णपणे दुसऱ्याच्या शेतावर रोजंदारी करणे | ,, | १६ | १७.७७ |
| ४) मेंढया चारणे | ,, | २ | २.२३ |
| एकूण : | | ९० | १००.०० |

कारखान्याच्या गळीत हंगामाच्या काळात (नोव्हेंबर ते मे) १०० टक्के कामगारांना ऊस तोडणीचे काम मिळत असते. या कालावधीत ऊस तोड कामगारांना इतर काम शोधण्याची गरज भासत नाही. परंतु हंगामेत्तर काळात (जून ते ऑक्टोबर) त्याना त्यांच्या मूळ गावी वेगवेगळी कामे करावी लागतात. सर्वेक्षणात असे आढळून आले की, हंगामेत्तर काळात ७२ उत्तरदाते (८० टक्के) हे स्वत:ची शेती कसत असतात. परंतु बहुसंख्य कामगार हे अल्पभूधारक व सीमांत शेतकरी असल्याने त्यांना स्वत:च्या शेतीवर पुरेसे काम नसते म्हणून दुस-याच्या शेतावरही काही प्रमाणात रोजंदारीने काम करीत असतात. एकूण उत्तरदात्या-पैकी १६ (१७.७७ टक्के) उत्तरदाते पूर्णपणे दुस-याच्या शेतीवर रोजंदारीने काम करीत होते. केवळ २ उत्तरदाते (२.२३ टक्के) हे मेंढया चारण्याचे काम करीत आहेत. थोडक्यात असे म्हणता येईल की, हंगामेत्तर काळात बहुसंख्य ऊस तोड कामगार त्यांच्या मूळ गावी शेतमजूर म्हणून काम करताना दिसतात. परंतु त्यांची मूळ गावे दुष्काळी भागात असल्याने व बहुतेक शेती जिराईत असल्याने पुरेशा प्रमाणात शेतमजुरीचे काम मिळत नाही. एकूण उत्तरदात्यापैकी ३८ उत्तरदात्यांचे असे म्हणणे आहे की, महिन्यातून फक्त १ ते ८ दिवस, ४९ उत्तरदात्यांच्या म्हणण्यानुसार महिन्यातून ९ ते १२ दिवस व ३ उत्तरदात्यांच्या म्हणण्यानुसार महिन्यातून १३ ते १६ दिवस शेतमजुरीचे काम मिळू शकते. सर्व उत्तरदात्यांच्या म्हणण्याचा एकत्रित विचार केला तर महिन्यातून सरासरी फक्त १२ दिवसच काम मिळते. तसेच या कालावधीत त्यांना मिळणारी दररोजची मजुरीही सर्वसाधारणपणे सरासरी १२ रूपये इतकीच मिळते. कारण ३५ उत्तरदात्यांच्या म्हणण्यानुसार त्यांच्या गावी शेतमजुरीचा दर प्रतिदिवशी १० रूपये, ४४ उत्तरदात्यांच्या मतानुसार १२ रूपये व ११ उत्तरदात्यांच्या मतानुसार १५ रूपये इतका आहे. एकंदरीत महिन्यास शेतमजुरीतून सरासरी १४४ रूपये (१२ दिवस x १२ रूपये) मिळतात. यावरून आपणास असे म्हणता येईल की, हंगामेत्तर काळातही उपजीविकेसाठी ऊस तोडणीच्या कामातून जे उत्पन्न मिळालेले आहे त्याच्यावरच ब-याच प्रमाणात अवलंबून रहावे लागते.

४.२.२ कामाचे तास -

ऊस तोडणी कामगार हे कंत्राटी व हंगामी आहेत. ते वर्षानुवर्षे तेच काम करीत असूनही कायम कामगार समजले जात नाहीत. शिवाय ते कारखान्याचे कामगार नाहीत. त्यामुळे दिवसांतून किती तास काम करावे, विश्रांती किती वेळ घ्यावी याचे निश्चित नियम नाहीत. कामाचे तास अनिश्चित आहेत. आठवडयातून त्यांना पगारी सुट्टी व रजा तसेच सार्वजनिक सुट्टया नसतात. आठवडयातील कामाचे दिवस निश्चित नाहीत. जितके काम जास्त तितका त्यांना मोबदला जास्त अशी स्थिती असल्याने त्यांना रात्रं-दिवस काम करावे लागते. कारखान्यावर ऊस पोहोच करून वाहन परत येईपर्यन्त ऊस तोडून तयार ठेवावा लागतो. रात्री वाहन परत आले तर अंधारातही ट्रक ऊसाने भरून देणे भाग पडते. थंडी, ऊन, अंधार यांची तमा न बाळगता त्यांना काम करावे लागते, कारण ते कंत्राटदारांशी बांधील असतात. थोडक्यात त्यांच्या कामाची समय-सूची निश्चित नसते. वाहतूकीतील अडथळा, वाहनाची नादुरूस्ती, कारखान्याची स्वच्छता व आजारपण या दिवशीच ते बिनपगारी सुट्टी घेऊ शकतात.

४.२.३ नुकसान भरपाई -

ऊस तोड कामगार हे कारखान्याचे कामगार नसल्याने त्याना कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई मिळत नाही. ऊस तोडणीचे काम करताना शरीरास काही इजा झाल्यास, किंवा ऊस भरताना वाहनावरून पडल्यास दवाखान्याचा खर्च कामगारांना स्वत: करावा लागतो. उत्तरदात्यांच्या म्हणण्यानुसार संपूर्ण गळीत हंगामामध्ये कारखान्याचा डॉक्टर एक-दोन वेळाच भेट देतो व केवळ किरकोळ औषधे दिली जातात. त्यांच्यासाठी साधी प्रथोमोपचाराची सोयही पुरविली जात नाही. कामगार कामावर असताना अपघात होऊन पूर्णत: किंवा अंशत: काम करण्यास असमर्थ ठरला तरी त्यास

वैद्यकीय किंवा आर्थिक मदत देण्याची कायदेशीर तरतूद नाही. काळी वेळेस अशी घटना घडलीच तर मृतदयेपोटी कारखान्याकडून अल्प प्रमाणात अर्थसहाय्य दिले जाते. कामगार संघटनेच्या नेत्यांच्या म्हणण्यानुसार संघटनेच्या रेटयामुळे कामगारांची झोपडी जळाल्यास १०० रुपये व गाडीवान कामगारांचा बैल जखमी झाल्यास १५० रुपये अर्थसहाय्य देण्याची तरतूद कारखान्याने केलेली आहे. किरकोळ औषधोपचार व अल्प अर्थसहाय्य या व्यतिरिक्त मरीव अशी नुकसान भरपाई मिळत नाही असा निष्कर्ष मिळतो.

४.२.४ कामाच्या ठिकाणाच्या सुधारणाबाबत अपेक्षा -

सर्वेक्षणामध्ये कामगारांच्या रोजगारीच्या स्थितीबाबत व कामाच्या ठिकाणी कोणत्या सुधारणा कामगारांना अपेक्षित आहेत याची तपासणी केली आहे. अपेक्षित सुधारणा बाबतचे खालील प्रमाणे सहा वर्ग केलेले आहेत.

१. कायम कामगार म्हणून मान्यता मिळावी.
२. वेतनवाढ.
३. कामाची हत्यारे व बैलगाडी याचे भाडे कमी करावे.
४. कारखान्याकडून काही उत्तेजनार्थ रोख बक्षिस मिळावे.
५. कामाच्या हत्यारांची पुरेशी पूर्तता करावी.
६. वेतनामध्ये प्रोत्साहक पध्दतीचा वापर करावा.

यापैकी एक, दोन व चार नंबरच्या अपेक्षित सुधारणांना उत्तरदात्यांनी अधिक प्रतिसाद दिलेला आहे. तीन व पाच नंबरच्या अपेक्षित सुधारणांना अल्प प्रतिसाद आहे, कारण कारखान्याकडून हत्यारांची पूर्तता पुरेशा प्रमाणात होत असून, त्यांना भाडेही नाममात्र आकारलेले दिसते. वेतनामध्ये प्रोत्साहक पध्दतीचा वापर करावा यासही अल्पसा प्रतिसाद असल्याचे आढळते.

कोष्टक क्र. ४.२

कामाच्या ठिकाणी अपेक्षित सुधारणांच्या मागणी-बाबत वर्गीकरण

| अनु. | अपेक्षित सुधारणा | उत्तरांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | कायम कामगार म्हणून मान्यता | ८८ | ३०.१३ |
| २. | वेतनवाढ | ९० | ३०.८३ |
| ३. | कामाची हत्यारे, बैलगाडी यांचे भाडे कमी करावे | ३ | १.०३ |
| ४. | कारखान्याकडून उत्तेजनार्थ बक्षिस मिळावे | ७५ | २५.७० |
| ५. | कामाच्या हत्यारांची पुरेशी पूर्तता | ७ | २.३८ |
| ६. | वेतनामध्ये प्रोत्साहक पध्दतीचा वापर करावा | २९ | ९.९३ |
| | एकूण : | २९२ | १००.०० |

टीप : उत्तरदात्यांनी एकापेक्षा अधिक अपेक्षित मागण्यांना उत्तरे दिल्याने उत्तरांची संख्या उत्तरदात्यांच्या संख्ये-पेक्षा अधिक येते.

कोष्टक क्रमांक ४.२ मध्ये दाखविल्याप्रमाणे कायम कामगार म्हणून मान्यता व वेतनवाढ या अपेक्षित मागणीस अनुक्रमे ३०.१३ टक्के व ३०.८३ टक्के इतका प्रतिसाद दिला आहे. हत्यारांचे भाडे कमी करावे, हत्यारांची पुरेशी पूर्तता करावी व वेतनामध्ये प्रोत्साहक पध्दतीचा वापर करावा या अपेक्षित मागण्यांचे प्रमाण अनुक्रमे १.०३,टक्के,व २.३८ टक्के व ९.९३ टक्के इतके आहे. उत्तेजनार्थ बक्षिस मिळावे याचे प्रमाण २५.७० टक्के इतके आहे. हंगामाच्या शेवटी कामगारांच्या एकूण बिलाच्या अल्प प्रमाणात बक्षिस

चालू गळीत हंगामात कारखान्याने दिलेले आहे. कायम कामगार म्हणून मान्यता व वेतनवाढ या दोन अपेक्षित मागणीचे प्रमाण सर्वात जास्त म्हणजे ६०.९६ टक्के इतके आहे.

४.२.५ वेतनदर व वेतनभिन्नता -

या उपविभागामध्ये वेतनाचा दर किती आहे ? वेतन भिन्नता असते का ? वेतन देण्याची पध्दती कशी आहे ? व वेतन दर ठरविण्याची पध्दत कशी आहे ? या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न केला आहे.

ऊस तोड कामगार हे कंत्राटी कामगार आहेत. तसेच ऊस तोडणीचे काम हे एकटया दुकटयाने करावयाचे नसून ते एक गट पध्दतीचे काम आहे. टोळीतील सर्व स्त्री-पुरूष कामगार एकत्रित काम करीत असतात. त्यामुळे वेतन दरामध्ये स्त्री व पुरूष कामगार, कार्यक्षम व कमी कार्यक्षम कामगार असा भेदभाव केला जात नाही. त्यामुळे वेतन दरात भिन्नता आढळून येत नाही. फक्त फरक इतकाच केला जातो की १५ वर्षाखालील स्त्री-पुरूष कामगार म्हणजे अर्धा कोयता गृहीत धरून त्या प्रमाणात त्याचे वेतन बील काढले जाते. तसेच कामगार संघाच्या नेत्याकडून मिळालेल्या माहितीनुसार असे समजते की ऊस तोड कामगाराचे वेतन सरकारच्या मध्यस्थीने ठरविले जात असल्याने महाराष्ट्रातील सर्व साखर कारखान्यातील ऊस तोडणीचा दर सारखाच आहे.

वेतन देण्याच्या पध्दती विषयी असे दिसून आले की, कारखान्याकडून १५ दिवसातून एक वेळ वेतन दिले जाते. कारखान्याकडून वेतन बील प्रत्यक्ष कामगारांच्या हातात दिले जात नाही. कारखाना कंत्राटदारास वेतन रक्कम देतो व कंत्राटदार मुकादमाकडे वेतन रक्कम देतो. मुकादम वेतन रकमेची वाटणी त्याच्या टोळीतील कामगारांच्यामध्ये करतो. म्हणजे कामगारास मध्यस्थातर्फे वेतन मिळते. वेतन देण्याच्या या पध्दतीबाबत ब-याच उत्तरदात्यांनी नापसंती

व्यक्त केली आहे. कारण कंत्राटदाराकडून वेळच्यावेळी वेतन दिले जात नाही. वेतन दर वाढीनंतर जी फरकाची रक्कम मिळते ती लवकर दिली जात नाही, काही वेळेला तो फरक कामगारापर्यन्त पोहचू शकत नाही असेही काही उत्तरदात्यांनी सांगितले. त्यामुळे या माहितीवरून असे अनुमान काढणे शक्य आहे की कंत्राटदार व मुकादम यांच्या संगनमताने ऊस तोड कामगारांचे आर्थिक शोषण होत असावे.

बैलगाडीवान व ऊस तोड कामगार यांना प्रति टनास वेतन दर किती दिला जातो हे कोष्टक क्रमांक ४.३ मध्ये नमूद केले आहे.

कोष्टक क्र.४.३

वेतन दर दर्शविणारा तक्ता

| तपशील | प्रति टनास दर (रुपये) |
|---|---|
| १) ऊस तोडणी - ऊस तोडणे, मोळ्या बांधणे व ट्रक, ट्रॅक्टर व ट्रेलरमध्ये भरणे | २८.४२ |
| २) बैलगाडी ऊस तोडणी व वाहतूक | |
| अ) ऊस तोडणे, साळणे, मोळ्या बांधणे व गाडीत भरणे. | २८.४२ |
| ब) (१) बैलगाडीने कारखान्यापर्यन्त ऊसाची वाहतूक करणे. पहिल्या १.६ कि.मी. | १३.१० |
| (२) पुढील प्रत्येक १.६ कि.मी. | २.८४ |

आधार : वसंत (दादा) शेतकरी सहकारी साखर कारखाना लि., सांगली, शेती कार्यालय - ऊस तोडणी व वहातूक विभाग, ऑफिस ऑर्डर.

कोष्टक क्र. ४.३ मध्ये दिलेले ऊस तोडणी व बैलगाडी वाहतूक दर १९८९-९० या वर्षाच्या गळीत हंगामापासून दिले जात आहेत. यापूर्वी हा दर प्रति टनास २१.०५ रुपये असा होता. ऑक्टोबर १९८९ मध्ये महाराष्ट्रातील सर्व साखर कारखान्यातील ऊस तोड कामगार दरवाढीच्या मागणीसाठी संपावर गेले होते. त्यावेळी सरकारने पूर्वीपेक्षा ३५ टक्के वेतनवाढ देण्याचे जाहीर केले. तेव्हा कोष्टक क्रमांक ४.३ मधील दिलेले दरपत्रक हे ३५ टक्केच्या नवीन वाढीव दरानुसार आहे.

कामगार कल्याण अधिकारी, साखर कारखाना, सांगली व साखर कामगार युनियन (इंटक) सांगली यांच्या पदाधिकाऱ्याकडून मिळालेल्या माहितीनुसार ऊस तोडणी कामगारांचे वेतन हे अधिकृतपणे किमान वेतन कायदा किंवा वेतन मंडळाच्या शिफारशीनुसार ठरविले जात नाही. कारण हे कामगार कारखान्याचे कामगार आहेत असे मानले जात नाही. असे असले तरी ऑक्टोबर १९८९ मध्ये ऊस तोडणी कामगारांच्या वेतनवाढीसाठी झालेल्या संपाच्यावेळी तडजोड करण्यासाठी दादासाहेब रूपवते यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र सरकारने वेतन निश्चितीसाठी एक समिती नेमली होती. या समितीने ऊस तोडणी व वाहतूक दरात जी ३५ टक्के वाढ देण्याचे मान्य केले, त्यावेळी शेतमजुरांच्यासाठी अस्तित्वात असलेला किमान वेतन कायदा हा पाया धरून व ऊस तोडणी कामाचे स्वरूप, तसेच या मजुरांचे त्यांच्या मूळ राहत्या गावी असणारे कामाचे स्वरूप याची तुलना करून वेतन दर ठरविला असेही संबंधित अधिकाऱ्यांच्याकडून असे सांगण्यात आले. या समितीने केलेल्या करारावर अजून अंतिम शिक्कामोर्तब व्हावयाचे असल्याने तो करार प्रत्यक्षात पाहण्यासाठी उपलब्ध होऊ शकला नाही. ऊस तोडणी कामगारांचे वेतन दर करारपध्दतीने ठरविले जातात. महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ, मुंबई, ऊस तोडणी कामगार प्रतिनिधी, कामगार संघ प्रतिनिधी, कंत्राटदारांचे प्रतिनिधी व महाराष्ट्र राज्य सरकार यांच्यामध्ये चर्चा होऊन तडजोडीतून

सर्वमान्य तोडगा काढून दर निश्चित केला जातो. व तसा लेखी करार केला जातो. निश्चित झालेल्या करारानुसार प्रत्येक साखर कारखाना प्रत्येक गळीत हंगामाच्यावेळी कंत्राटदारांशी तसे करार करतात. यावरून ऊस तोडणी कामगारांच्या वेतन दर निश्चितीबाबत सर्वसाधारण खालील मुद्दे मांडता येतील.

१) ऊस तोडणी कामगारांचे वेतन करार पध्दतीने ठरविले जाते.

२) वेतन दर निश्चित करताना कामगारांच्या कार्यक्षमतेचा विचार होत नाही.

३) ऊस तोडणी कामगारांच्या पैशातील वेतनाची शेतमजुरांच्या पैशातील वेतनाशी तुलना करता त्यांना पैशातील वेतन अधिक मिळते परंतु वास्तव वेतन मात्र कमी मिळते.

४) ऊस तोडणी कामगारांच्या कामाचे तास निश्चित नाहीत. त्यांना २४ तास त्याच कामात अडकून पडावे लागते. परंतु शेतमजुरांचे तसे नसते, त्यांनी दिवसातून ५ ते ६ तास काम केले की ते इतरवेळी धरच्या कामास रिकामे असतात.

५) ऊस तोडणी हंगामाच्या काळात त्याना आपले गाव सोडून यावे लागते त्यामुळे त्यांना कुटुंब व्यवस्था व स्वत:ची शेती व अन्य व्यवसायावर लक्ष देता येत नाही.

६) धर, आरोग्य व आहार या सर्वच दृष्टीने त्यांची गैरसोय होते. मात्र शेतमजुरांना या समस्यांना तोंड द्यावे लागत नाही.

७) ऊस तोडणी कामगारांची औद्योगिक कामगारांशी तुलना करता सर्वसाधारणपणे असे म्हणता येईल की त्यांना पैशातील वेतन व वास्तव वेतन फारच अल्प मिळते.

८) पगारी रजा, सार्वजनिक सुट्या, पगारी आठवड्याची सुट्टी, कामगार कल्याण कायदे, सामाजिक सुरक्षितता कायदे यांचा लाभ मिळत नाही.

९) ऊस तोडणी कामगार व गाडीवान कंत्राटांद्वारे कामावर घेतले जातात. परंतु हे कंत्राटदार कंत्राटी कामगार अधिनियमांतर्गत परवाना घेत नसावेत. मजूरखातेही याकडे दुर्लक्ष करते. अशा परिस्थितीत कंत्राटदारांकडून कामगारांच्या होणा-या शोषणाला आळा बसू शकत नसल्याने ते मटक्या गुलामीचे व वेठबिगारीचे जीवन जगत आहेत.

१०) ऊस तोडणी व बैलगाडीवान कामगार हे साखर उत्पादन संबंधित कारखान्यांचे कामगार आहेत व त्यांना कारखान्यातील कामगारा-प्रमाणे वेतन मिळेल या रीतीने त्यांचे वेतनाचे दर ठरविले जावेत हे तत्व उच्च व सर्वोच्च न्यायालयाच्या निवाड्यातून प्रस्थापित झाले असताना प्रस्थापित साखर उद्योजक अद्यापही या निवाड्याची अंमलबजावणी न करता या कामगारांची आर्थिक कोंडी करून त्यांचे शोषण करीत आहेत असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

४.२.६ <u>सोयी सवलतींची उपलब्धता</u> -

ऊस तोडणी कामगारांना ऊस तोडणीसाठी कारखान्याकडून कोयता दिला जातो. कारखाना शेतकी अधिका-यांच्याकडून मिळालेल्या अधिकृत माहिती-नुसार कोयेत्याची किंमत कारखाना १५ रूपये इतकी वसूल करतो. परंतु ब-याच उत्तरदात्यांनी कोयत्यासाठी ४० ते ५० रूपये कापून घेतात असे मत नोंदविले. म्हणजेच येथेही कंत्राटदारांच्याकडून या कामगारांचे आर्थिक शोषण होते. तसेच हंगामाच्या सुरूवातीस ऊस तोड कामगारांना १००० रूपये ते १००० पेक्षा अधिक व बैलगाडीवानास ५ ते ६ हजार रूपये उचल देण्याची सोय आहे. गाडीवानांना कारखान्याकडून टायरच्या चाकाची बैलगाडी भाड्याने मिळू शकते. बैलगाडीस भाडे २४ तासास १० रूपये इतके आकारले जाते. गाडीची किरकोळ दुरूस्ती (टायर पंक्चर) सोडता इतर दुरूस्ती कारखाना करतो. गाडीची किंमत ७५०० रूपये इतकी आहे. गाडी स्वत: खरेदी करावयाची झाल्यास

गाडीवानास कारखान्याकडून कर्ज मिळू शकते. हे कर्ज ५ वर्षांच्या मुदतीत प्रतिवर्षी २० टक्के याप्रमाणे कामाच्या बिलातून फेडावयाचे असते. त्यासाठी गाडीवानांना स्वत:चे भांडवल गुंतवावे लागत नाही. तसेच या कामगारांना कामाच्या ठिकाणी झोपड्या उभारण्यासाठी कारखान्याकडून बांबू, चिवटया व तट्टया पुरविला जातो. गळीत हंगाम संपल्यानंतर त्यांच्या एकूण वेतन रकमेच्या प्रमाणात कारखान्याकडून स्वच्छेने बक्षिस म्हणून अल्पशी रक्कम दिली जाते.

ऊस तोड कामगार कुटुंबाना कारखान्याकडून भविष्य निर्वाह निधी, वैद्यकीय मदत, राहत्या घरासाठी जागा व मुलांचे शिक्षण या विषयक कोणतीच सवलत मिळत नाही. कारण हे कामगार कायम नसल्याने त्यांना वरील सोयी सवलती लागू होत त नाहीत. ऊस तोड कामगारांच्या मुलांच्यासाठी साखर शाळा सुरू केल्या आहेत. पण त्या जवळ जवळ अयशस्वीच ठरलेल्या आहेत. सर्वेक्षणामध्ये या कामगारांना, तुम्हास कोणत्या सोयी सवलती अपेक्षित आहेत ? असा प्रश्न विचारलेला होता. त्या प्रश्नास उत्तरदात्यांनी दिलेल्या उत्तरांचेनुसार त्यांना अपेक्षित असणाऱ्या सोयी सवलतींचे वर्गीकरण कोष्टक क्रमांक ४.४ मध्ये केलेले आहे.

कोष्टक क्र. ४.४

वेतनाशिवाय इतर लाभांच्या अपेक्षानुसार
उत्तरदात्यांचे वर्गीकरण

| अनु. | अपेक्षित लाभ | उत्तरदात्यांची संख्या | शेकडा प्रमाण |
| --- | --- | --- | --- |
| १. | बोनस | ४० | ४४.४५ |
| २. | बोनस व वैद्यकीय मदत | २४ | २६.६७ |
| ३. | बोनस, फंड, निवृत्तीवेतन हंगामेत्तर काळातील निम्मा पगार | ४ | ४.४५ |
| ४. | बैलगाडी वाहतूक दरवाढ | ६ | ६.६६ |
| ५. | काहीही अपेक्षा नाही | १६ | १७.७७ |
| | एकूण : | ९० | १००.०० |

कोष्टक क्र. ४.४ मधील आकडेवारीवरून असे स्पष्ट होते की, या कामगारांना वेतनाशिवाय प्रामुख्याने बोनस विषयक अपेक्षा अधिक आढळते. एकूण उत्तरदात्यांपैकी ४४.४५ टक्के उत्तरदात्यांनी बोनसची अपेक्षा केलेली आहे. २६.६७ टक्के उत्तरदात्यांनी बोनस व वैद्यकीय मदत, ४.४५ टक्के उत्तरदात्यांनी बोनस, भविष्य निर्वाह निधी, निवृत्ती वेतन व हंगामेत्तर काळात निम्मा पगार व ६.६६ टक्के उत्तरदात्यांनी बैलगाडी वाहतूक दरात वाढ करावी अशी अपेक्षा व्यक्त केलेली आहे. तर १७.७७ टक्के उत्तरदात्यांनी कोणतीच अपेक्षा व्यक्त केलेली नाही.

४.२.७ कारखाना व कामगार संबंध -

ऊस तोड कामगार हे कंत्राटी कामगार असल्याने ते कारखान्याचे कामगार ठरत नाहीत. परंतु या कामगारांचे वेतन ठरविण्याचे काम कारखानाच करीत असतो. त्यामुळे अप्रत्यक्षरित्या कारखाना हाच या कामगारांचा मालक असतो. परंतु या कामगारांचा कारखान्यांशी कोणताच संबंध येत नाही. त्यांचे वेतनही कामाच्या ठिकाणी कंत्राटदारांच्याकडून मिळते. तेव्हा कारखान्यांशी तुमचे संबंध कसे आहेत ? या प्रश्नास बहुतेक उत्तरदात्यांनी औपचारिकरित्या चांगले आहेत अशी उत्तरे दिली आहेत.

४.२.८ कामगार संघटना -

कामगार संघ नेत्यांच्याकडून मिळालेल्या माहितीनुसार ऊस तोड कामगार संघ स्थिती व कृती याबाबत माहिती खालील प्रमाणे आहे. ऊस तोड कामगार हे अशिक्षित व असंघटित असल्याने त्यांच्यामध्ये संघटना व संघटनेचे फायदे याविषयी फारशी जाणीव दिसत नाही. बहुतेक उत्तरदाते प्रतिवर्षी सतत ऊस तोडणीच्या कामावर येत असले तरी काही कामगार नव्याने कामावर येत असतात. म्हणजे १०० टक्के तेच कामगार प्रत्यक वर्षी कामावर येत नाहीत. त्यामुळे संघटनेचे सभासदत्व बदलते. त्यामुळे नियमित वर्गणी भरणारे व कायम सदस्य असणारे अशी स्थिती संघटनेची नाही. साखर कारखान्यात काम करणारे कामगार व ऊस तोड कामगार यांच्या स्वतंत्र संघटना आहेत. फक्त फायद्याच्यावेळी सर्व ऊस तोड कामगार एकत्र येतात व पुन्हा ते विस्कळीत होतात. १९८५-८६ च्या गळीत हंगामामध्ये दरवाढीच्या हेतूने त्यांनी संप केला होता. त्या संपानुसार ऊस तोडणी दरात ५० टक्के वाढ मिळाली. १९८७ साली वाढीव दरातील फरक मिळणार होता. त्यावेळी १०० टक्के कामगार वर्गणी भरून अधिकृतपणे संघटनेचे

सभासद झालेले होते. परंतु त्यानंतर मात्र नियमितपणे वर्गणी भरताना आढळून येत नाही. १९८९-९० च्या गळीत हंगामात पुन्हा ऊस तोडणी दर वाढीसाठी संप पुकारला तेव्हा १०० टक्के कामगार संपावर होते, परंतु प्रत्यक्षात सर्व कामगार संघटनेचे सदस्य नव्हते. ऊस तोड कामगार संघटनेने आतापर्यंन्त खालील लाभ मिळवून दिले आहेत :

१) १९८५-८६ च्या गळीत हंगामापूर्वी ऊस तोडणी दर प्रति टनास १४ रूपये इतका होता. त्या दरात १९८५-८६ मध्ये ५० टक्के वाढ (प्रति टनास २१.०५ रूपये) १९८९-९० पासून ३५ टक्के वाढ (प्रति टनास २८.४२ रूपये) मिळवून देण्यात यश मिळाले आहे.

२) कारखान्याच्या आवारातील बैलगाडी तळावर बैलांना पिण्यास पाणी व लाईट व्यवस्था करून घेतली आहे.

३) ऊस तोड कामगारांच्या मुलांसाठी काही ठिकाणी कारखान्या-मार्फत साखर शाळा सुरू केल्या, परंतु त्या फारशा यशस्वी झाल्या नाहीत.

४) ऊस तोड कामगारांना झोपडीसाठी नाममात्र किंमतीत बांबू, चिवटया व तट्टया हे साहित्य पुरविले जात आहे.

५) २० कलमी कार्यक्रमाखाली कामगारांना कामाच्या ठिकाणी ताबडतोब घरे उभारता येतील, ती खोलता येतील व गळीत हंगाम संपल्यावर कारखान्याकडे जमा करता येतील अशा फिरत्या शेडची घर योजना कारखान्याकडून मान्य करून घेतली आहे.

६) भारतातील इतर घटक राज्यामध्ये ऊस तोड कामगारांची स्थिती फार वाईट आहे. कारण ऊस उत्पादक सभासदांनीच ऊस तोडून कारखान्यास पुरवावयाचा असतो. त्यामुळे ऊस तोड कामगारांना ऊस तोडणीचे अल्प व वेगवेगळे दर दिले जातात.

परंतु महाराष्ट्रात मात्र संघटनेच्या दबावामुळे अप्रत्यक्षपणे कारखाना ऊस तोडणीची जबाबदारी स्वीकारतो आहे. संपूर्ण महाराष्ट्रभर एकच ऊस तोडणीचा दर मिळवून देऊन ऊस उत्पादकांच्याकडून ऊसतोड कामगारांच्या होणाऱ्या आर्थिक शोषणास अप्रत्यक्ष अटकाव घातला आहे. संपूर्ण भारतात महाराष्ट्र हे एकच असे राज्य आहे की, जेथे ऊस तोडणीची जबाबदारी कारखाना स्वीकारतो. हे संघटनेच्या यशस्वी लढयामुळे झाले आहे. ऊस तोड कामगार संघाच्या यशाचे श्रेय हे या संघाच्या नेत्यांकडेच जाते, असेही मत बहुतेक कामगारांनी व्यक्त केले.

## ४.३ ऊस तोड कामगारांची आर्थिक सद्यःस्थिती :

या उपविभागामध्ये ऊस तोड कामगारांच्या आर्थिक स्थितीविषयक खालील घटकांचे विवेचन केले आहे :

१) उत्तरदात्यांचे मासिक उत्पन्न.
२) उत्तरदात्यांचा मासिक खर्च.
३) उत्तरदात्यांची मालमत्ता.
४) उत्तरदात्यांचे उपभोग्य वस्तू खरेदीचे मार्ग.
५) उत्तरदात्याच्या कर्जबाजारीपणाचे प्रमाण.

### ४.३.१ ऊस तोड कामगारांचे मासिक उत्पन्न -

उत्तरदात्या ऊस तोड कामगारांचे मासिक उत्पन्न ठरविताना त्यांच्या उत्पन्नाचे तीन मार्ग विचारात घेतले आहेत.

अ) ऊस तोडणीपासूनचे उत्पन्न - उत्तरदात्या ऊस तोड कामगार कुटुंबाचे ऊस तोडणीचे मासिक उत्पन्न काढताना त्या कुटुंबातील काम करणारे

सदस्य प्रतिदिवशी किती टन ऊस तोडतात हे विचारात घेतले आहे. तसेच प्रत्येक महिन्यात वाहतुकीतील अडथळा, कारखान्याची स्वच्छता व आजारपण यामुळे तीन दिवस कामात खाडे होतात असे मानले आहे. प्रत्येक महिन्यात तो कामगार २७ दिवस काम करतो आहे. थोडक्यात प्रतिदिनी तोडले गेलेल्या ऊसाचे टन गुणीले प्रति टनास कारखान्याकडून मिळणारा दर (रुपये) गुणीले महिन्यातील एकूण २७ दिवस बरोबर मासिक उत्पन्न होय.

ब) <u>ऊसाच्या वाडयापासून मिळणारे उत्पन्न</u> - तोडलेल्या ऊसाच्या वाडयापैकी निम्मे वाडे ऊस उत्पादक शेतकऱ्यांना व निम्मे वाडे ऊस तोड कामगारांना मिळत असते. ऊस तोड कामगारांनी स्वत: बरोबर काही जनावरे आणलेली असतात. ती जनावरे पोसण्यासाठी काही वाडे वापरले जाते व त्यातून राहिलेले वाडे विकले जाते. तसेच ज्यांच्याकडे जनावरे नाहीत, असे कामगार संपूर्ण वाडे विकत असतात. कारखान्याच्या गळीत हंगामाच्या सुरुवातीस म्हणजे ऑक्टोबर ते जानेवारीपर्यन्त वाडयाच्या विक्रीपासून फारशी उत्पन्न मिळत नाही. कारण या काळात सर्वच शेतकऱ्यांच्या शेतात हिरवा चारा असतो. त्यामुळे वाडयास फारशी मागणी नसते. तेथून पुढच्या काळात मात्र वाडयापासून अधिक उत्पन्न मिळते. कारण हिरव्या चाऱ्याच्या अभावामुळे वाडयास किंमत अधिक मिळते. तसेच शहरी भागाच्या जवळ ऊस तोडणी करणाऱ्या कामगारांना व बैलगाडीवानांना वाडयापासून अधिक उत्पन्न मिळते. उत्तरदात्यांनी मात्र वाडयापासून फारसे उत्पन्न मिळत नाही अशीच उत्तरे दिली आहेत. परंतु कंत्राटदार यांच्याकडून मिळालेल्या माहितीनुसार व प्रत्यक्ष निरीक्षणातून असे निदर्शनास आले की प्रत्येक कोयत्यास प्रतिदिनी सरासरी १० रुपये वाडयापासून उत्पन्न मिळते. मासिक उत्पन्न ठरविताना जे कामगार एकटे आहेत व ज्या कुटुंबात दोन कामगार आहेत परंतु ते प्रतिदिनी १ ते १.२५ टन ऊस तोडतात, त्यांना प्रत्येक दिवसास वाडयापासून ५ रुपये मिळतात. ज्या कुटुंबात दोन

कामगार आहेत व प्रत्येक दिवसात १.५० टनापर्यन्त ऊस तोडतात त्यांना प्रत्येक दिवसास वाड्यापासून १० रुपये मिळतात. तसेच ज्या कुटुंबात २ पेक्षा अधिक कामगार संख्या आहे, त्यांना प्रत्येक दिवसास वाड्यापासून १५ रुपये मिळतात असे सर्वसाधारणपणे मानले आहे. कुटुंबातील कामगार सदस्यांची संख्या जितकी जास्त तितके वाड्यापासूनचे उत्पन्न जास्त असे मानले नाही. कारण त्याच बरोबर त्यांची कार्यक्षमता व त्यांच्या बरोबर असणाऱ्या जनावरांची संख्या याचाही विचार केला आहे. या सर्व गोष्टींचा विचार करून ऊस तोड कामगार कुटुंबाच्या मासिक उत्पन्नात वाड्यापासून मिळणारे उत्पन्नही समाविष्ट केलेले आहे.

क) <u>जनावरापासूनचे उत्पन्न</u> - बहुतेक ऊस तोड कामगार कुटुंबे गाई, शेळ्या यासारखी दुभती जनावरे बरोबर घेऊन येतात. परंतु या जनावरांपासून मिळणारे दूध चहासाठी व लहान मुलांच्यासाठी वापरले जाते. त्यामुळे दूध विक्रीतून उत्पन्न मिळत नाही. तेव्हा उत्तरदात्यांच्या म्हणण्यानुसार जनावरांपासून पैशातील उत्पन्न मिळत नाही. त्यामुळे जनावरांपासून कोणतेच उत्पन्न मिळत नाही असे मानले आहे. थोडक्यात ऊस तोड कामगारांच्या मासिक उत्पन्नात ऊस तोडणी पासूनचे उत्पन्न व वाड्यापासूनचे उत्पन्न या दोनच घटकांचा समावेश होतो.

कोष्टक क्र.४.५

उत्तरदात्या ऊस तोड कामगार कुटुंबाचे मासिक उत्पन्न

| अनु. | उत्पन्न गट (रूपये) | कुटुंबाची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | ५०० ते १००० | १७ | १८.८९ |
| २. | १००१ ते १५०० | ६१ | ६७.७८ |
| ३. | १५०१ ते २००० | ५ | ५.५६ |
| ४. | २००१ ते २५०० | - | - |
| ५. | २५०१ ते ३००० | ३ | ३.३३ |
| ६. | ३००० पेक्षा अधिक | ४ | ४.४४ |
| | एकूण : | ९० | १००.०० |

कोष्टक क्रमांक ४.५ मधील आकडेवारीवरून हे स्पष्ट होते की १००१ ते १५०० रूपये इतके मासिक उत्पन्न असणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या सर्वाधिक असून एकूण उत्तरदात्यांशी त्यांचे प्रमाण ६७.७८ टक्के इतके आहे. ५०० ते १००० रूपये पर्यन्त उत्पन्न मिळविणाऱ्या कुटुंबाची संख्या १७ इतकी असून त्यांचे एकूण उत्तरदात्याशी प्रमाण १८.८९ टक्के इतके आहे. १५०१ ते २००० रूपये पर्यन्त मासिक उत्पन्न असणाऱ्या उत्तरदात्यांचे प्रमाण ५.५६ टक्के इतके आहे. २००१ ते २५०० रूपये पर्यन्त उत्पन्न असणारे एकही कुटुंब नाही. २५०१ ते ३००० रूपये व ३००० रूपयेपेक्षा अधिक मासिक उत्पन्न असणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या अनुक्रमे ३ व ४ इतकी असून दोहोंचे मिळून एकूण उत्तरदात्यांशी प्रमाण ७.७७ टक्के इतके आहे. ९२.२३ उत्तरदात्यांचे मासिक उत्पन्न २००० रूपयांपेक्षा कमी आहे.

### ४.३.२ ऊस तोड कामगारांचा मासिक खर्च -

ऊस तोड कामगार कुटुंबाच्या मासिक खर्चामध्ये विविध उपभोग्य वस्तूवरील खर्चाबरोबरच कर्जावरील व्याज व कर्ज परतफेडीचा हप्ता व स्थलांतरीत ऊस तोड कामगार त्यांच्या मूळगांवी पैसे पाठवितात त्यांचा समावेश केलेला आहे. मुलांच्या शाळेवरील खर्चाचा विचार यामध्ये केलेला नाही. कारण कामाच्या ठिकाणी त्यांची मुले शाळेस जात नाहीत. उत्तरदात्या ऊस तोड कामगार कुटुंबांच्या मासिक खर्चाचे वर्गीकरण कोष्टक क्रमांक ४.६ मध्ये दिलेले आहे.

कोष्टक क्र. ४.६

ऊस तोड कामगार कुटुंबांचा मासिक खर्च

| अनु. | मासिक एकूण खर्च (रूपये) | कुटुंबांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | ३०० ते ५०० | ५ | ५.५५ |
| २) | ५०१ ते १००० | ५३ | ५८.९० |
| ३) | १००१ ते १५०० | २४ | २६.६६ |
| ४) | १५०१ पेक्षा अधिक | ८ | ८.८९ |
| | एकूण : | ९० | १००.०० |

५०१ ते १००० रूपये पर्यन्त मासिक खर्च असणाऱ्या कुटुंबांची संख्या सर्वाधिक म्हणजे ५३ इतकी असून एकूण उत्तरदात्या कुटुंबाशी त्यांचे प्रमाण ५८.९० टक्के इतके आहे. ५०० रूपये पेक्षा अधिक मासिक खर्च असणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण अल्प म्हणजे केवळ ५.५५ टक्के इतके आहे. १००१ ते १५००

रूपये पर्यन्त मासिक खर्च असणाऱ्या कुटुंबांची संख्या २४ इतकी असून त्यांचे एकूण उत्तरदात्यांशी प्रमाण २६.६६ टक्के इतके आहे. ज्या कुटुंबातील सदस्य संख्या अधिक आहे व जे बैलगाडीवान बैलांना पेंड देतात त्यांचा मासिक खर्च १५०१ रूपयेपेक्षा जास्त आहे. अशा कुटुंबाचे एकूण कुटुंबांशी प्रमाण ८.८९ टक्के इतकेच आहे. उत्तरदात्यांच्या मासिक खर्चामध्ये मूळगावी पाठविलेल्या पैशांचाही समावेश केला आहे. त्यामुळे त्याविषयी स्पष्टीकरण करणे गरजेचे ठरते. सर्वेक्षणातील एकूण ९० उत्तरदात्यांपैकी १० उत्तरदाते स्थानिक आहेत. तेव्हा त्यांनी पैसे पाठविण्याचा प्रश्नच येत नाही. ८० स्थलांतरीत उत्तरदात्यांपैकी १७ उत्तरदाते गावाकडे पैसे पाठवित नाहीत. कारण त्यांच्यापैकी काही कुटुंबे अशी आहेत की त्यांचे मूळगावी कोणीही रहात नाही व काही कुटुंबे अशी आहेत की त्यांना मूळगावी पैसे पाठविण्याची गरज भासत नाही. कारण गावी त्यांची आर्थिक स्थिती बरी आहे. तसेच एकूण स्थलांतरीत उत्तरदात्यांपैकी १३ उत्तरदाते असे आहेत की, त्यांनी हंगामाच्या सुरूवातीस एकदम उचल घेऊन गावी पैसे दिलेले आहेत. तसेच एकूण ८० स्थलांतरीत उत्तरदात्यांपैकी ५० उत्तरदाते असे आहेत की जे महिन्यातून एक किंवा दोन वेळा मनिऑर्डरच्या सहाय्याने किंवा त्यांच्यापैकी एखादा कामगार गावी जातो, त्याच्या बरोबर पैसे पाठवून देतात.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

## कोष्टक क्र. ४.७

मूळगांवी पैसे पाठविण्याच्या प्रमाणानुसार वर्गीकरण

| अनु. | तपशील | कुटुंबाची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | मूळगांवी पैसे न पाठविणारे | १७ | २१.२५ |
| २) | हंगामाच्या सुरुवातीस एकदम उचल घेऊन गांवी पैसे देणारे | १३ | १६.२५ |
| ३) | प्रति महिन्यास १०० रुपयांपर्यन्त पैसे पाठविणारे | १९ | २३.७५ |
| ४) | प्रति महिन्यास १०१ ते २०० रुपये पाठविणारे | १७ | २१.२५ |
| ५) | प्रति महिन्यास २०० रुपये किंवा जास्त पैसे पाठविणारे | १४ | १७.५० |
| | एकूण : | ८० | १००.०० |

कोष्टक,क्रमांक ४.७ मधील आकडेवारीवरून हे स्पष्ट होते की एकूण उचरदात्यांपैकी २१.२५ टक्के उचरदाते गावाकडे पैसे पाठवित नाहीत. एकूण उचरदात्यांपैकी १६.२५ टक्के उचरदाते हंगामाच्या सुरुवातीस एकदम मूळगांवी पैसे देतात व ६२.५० टक्के उचरदाते प्रति महिन्यास १०० ते २५० रुपयांपर्यन्त मूळगांवी पैसे पाठवितात.

### ४.३.३ उपभोग्य खर्चाची रचना :

ऊस तोड कामगार कुटुंबाच्या सर्वेक्षणामध्ये त्यांचा विविध खर्च किती प्रमाणात व कोणत्या वस्तूवर केला जातो याचीही माहिती जमा केली आहे. त्या माहितीच्या आधारे या कुटुंबाचा एकूण सरासरी खर्च किती ? यापैकी प्रत्येक उपभोग्य वस्तूवर सरासरी खर्च किती ? याची माहिती कोष्टक क्रमांक ४.८ मध्ये दिलेली आहे. या कोष्टकात दाखविल्याप्रमाणे पहिले दोन घटक अधिक महत्वाचे आहेत. पहिला घटक अन्नधान्य यामध्ये प्रामुख्याने ज्वारी व त्याचबरोबर काही प्रमाणात गहू व तांदूळ यांचा समावेश होतो. दुसरा घटक म्हणजे प्रामुख्याने किराणामाल, यामध्ये चहा, साखर , खाद्यतेल, डाळी व इतर किराणामाल तसेच दूध व भाजी यांचाही समावेश करण्यात आला आहे. या दोन घटकावरच होणा-या खर्चाचे प्रमाण अधिक आहे. त्याच बरोबर या कामगारांना झोपडीमध्ये रहावे लागते शिवाय थंडीतही काम करावे लागते. त्यामुळे अंथरुण-पांघरुण यावरील खर्चही महत्वाचा ठरतो. तसेच या स्थलांतरीत ऊस तोड कामगारांचे वृध्द आई-वडील, शाळेला जाणारी मुले ही त्यांच्या मूळगावी राहत असतात. त्यांच्यासाठी नियमित पैसे पाठविण्याची गरज असते. म्हणून या मूळगावाकडे जे पैसे पाठविले जातात त्यांचा समावेशही उपभोग्य खर्चामध्ये केलेला आहे. बहुतेक कुटुंबे ही कर्जबाजारी असल्याने उपभोग्य खर्चामध्ये कर्जफेड व कर्जावरील व्याज यांचाही समावेश केलेला आहे. प्रत्येक उपभोग्य वस्तूवरील खर्चाची सविस्तर माहिती कोष्टकात दिलेली आहे.

कोष्टक क्र. ४.८

उचरदात्यांच्या मासिक खर्चाचे वर्गीकरण

| अनु. | तपशील | मासिक सरासरी खर्च (रुपये) | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १)ड | अन्नधान्य | २७३ | २८.६६ |
| २) | किराणामाल, दूध, भाजी | २७० | २८.३३ |
| ३) | अंथरुण-पांघरुण व कपडे | १०३ | १०.८२ |
| ४) | पान, सुपारी, तंबाखु इत्यादी | ४१.५० | ४.३५ |
| ५) | घरभाडे व दुरुस्ती | - | - |
| ६) | आरोग्यावरील खर्च | ३८.९० | ४.०८ |
| ७) | शिक्षण | - | - |
| ८) | कर्जफेड हप्ते व कर्जावरील व्याज | ११९.५० | १२.५५ |
| ९) | हत्यारांचे भाडे व दुरुस्ती | १.८७ | ०.१९ |
| १०) | मूळगावी पाठविलेले पैसे | १०५ | ११.०२ |
| | एकूण : | ९५२.७७ | १००.०० |

कोष्टकातील आकडेवारीवरुन हे स्पष्ट होते की, अन्नधान्ये, किराणामाल, दूध व भाजी यावरील खर्चाचे प्रमाण सर्वाधिक असून मासिक खर्चापैकी ५४३ रुपये म्हणजे ५६.९९ टक्के इतका खर्च या आवश्यक गटावर होतो आहे. त्याच्या खालोखाल कर्जफेडीचे हप्ते व कर्जावरील व्याज यावरील खर्चाचे प्रमाण मासिक खर्चाच्या १२.५५ टक्के इतके आहे. यानंतर मूळगावी पाठविलेले पैसे या घटकाचा क्रम लागत असून त्यामध्ये महिन्यास सरासरी १०५ रुपये म्हणजे मासिक एकूण सरासरी खर्चाच्या ११.०२ टक्के इतका खर्च होतो आहे. अशारीतीने मासिक खर्चाची क्रमवार विभागणी

केल्यास यानंतर अंथरूण, पांघरूण व कपडे यावर १०.८२ टक्के, पान, सुपारी व तंबाखु यावर ४.३५ टक्के, आरोग्य व औषधोपचार यावर ४.०८ टक्के व हत्यारांचे भाडे व दुरूस्ती यावरील मासिक खर्चाचे प्रमाण ०.१९ इतकेच आहे. यावरून हे स्पष्ट होते की कमी उत्पन्न गटातील लोकांचा अन्नधान्य व किराणा माल या आवश्यक उपभोग्य वस्तूवरील खर्च अधिक असतो.

४.३.४ सरासरी उत्पन्न, खर्च आणि कुटुंबाचा आकार -

कोष्टक क्रमांक ४.९ मध्ये उत्तरदात्या ऊस तोड कामगार कुटुंबाचा मासिक सरासरी खर्च, मासिक सरासरी उत्पन्न व कुटुंबाचा सरासरी आकार याविषयक माहिती दिलेली आहे.

कोष्टक क्र. ४.९

मासिक सरासरी उत्पन्न, मासिक सरासरी खर्च व कुटुंबाचा आकार

| उत्तरदात्या कुटुंबांची संख्या | मासिक सरासरी उत्पन्न (रूपये) | मासिक सरासरी खर्च (रूपये) | कुटुंबाचा सरासरी आकार |
|---|---|---|---|
| ९० | १३२२.२२<br>(३८१.०४) | ९५२.७७<br>(२७४.५७) | ३.४७ |

टीप : कंसातील अंक दरडोई उत्पन्न व दरडोई खर्चाचे आहेत.

कोष्टक क्र. ४.९ मधील मासिक सरासरी उत्पन्न व खर्चाचे आकडे फक्त ऊस तोड गळीत हंगामाच्या काळाशीच संबंधित आहेत. हंगामेत्तर काळात रोजगार व उत्पन्न याविषयी स्थिती यापेक्षा गंभीर असते. (पाहा ४.२.१) त्यामुळे वार्षिक सरासरी उत्पन्न व खर्च यांचा विचार केला तर हे आकडे

यापेक्षाही कमी येतील. कोष्टक क्र. ४.९ मध्ये दाखविल्याप्रमाणे उत्तरदात्या ऊस तोड कामगार कुटुंबाचा सरासरी आकार ३.४७ इतका आहे. या कुटुंबाचे मासिक सरासरी उत्पन्न १३२२.२२ रुपये असून दरडोई मासिक उत्पन्न ३८१.०४ रुपये इतके आहे. त्याचबरोबर या कुटुंबांचा मासिक सरासरी खर्च ९५२.८७ रुपये व दरडोई मासिक खर्च २७४.५७ रुपये इतका आहे. मासिक दरडोई उत्पन्नापेक्षा दरडोई मासिक खर्चाचे आकडे कमी आहेत. यावरून ऊस तोड कामगार प्रत्येक महिन्यास दरडोई सरासरी १०६.४७ रुपये शिल्लक ठेवू शकतात. ही मासिक दरडोई शिल्लक फक्त गळीत हंगामापुरतीच मर्यादित आहे. परंतु हंगामेतर काळाचा विचार करता त्या काळातील त्यांचे दरडोई मासिक उत्पन्न फारच अल्प असते. शिवाय अशा काळातील कर्जफेडीचे हप्ते व व्याजाचे हप्ते भरावयाचे असतात. त्यामुळे या शिल्लक उत्पन्नाचा विनियोग ते या कारणासाठी करीत असावेत. त्यामुळे एकूण वर्षाचा विचार करता ते काहीच शिल्लक ठेवू शकत नाहीत, असा निष्कर्ष निघू शकतो.

### ४.३.५ ऊस तोड कामगार कुटुंबाची कामाच्या ठिकाणची मालमत्ता -

ऊसतोड कामगार कुटुंबाची कामाच्या ठिकाणच्या मालमत्तेमध्ये प्रामुख्याने घरातील वस्तू व बरोबर आणलेली जनावरे यांचाच समावेश होतो. स्थानिक ऊस तोड कामगारांनासुध्दा त्यांच्या राहत्या गावीच गळीत हंगाम संपेपर्यन्त ऊस तोडणीचे काम मिळेल असे नाही. त्यामुळे त्यांना कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील इतर गावीसुध्दा ऊस तोडणीसाठी जावे लागते. त्यामुळे स्थानिक व स्थलांतरीत ऊस तोड कामगारांची या मालमत्तेच्या संदर्भात स्थिती सारखीच असते. सर्वच ऊस तोड कामगारांचे राहते घर म्हणजे बांबू, चिवटया व (चटई) तट्टया किंवा ऊसाचा पाला यापासून बनविलेली झोपडी असते. या झोपडीमध्ये स्वयंपाक करण्यासाठी व जेवण्यासाठी अल्युमिनियम व पितळेच्या थाळ्या, लोखंडी पत्र्याची घागर व बादली, पातेले, तवा इत्यादी भांडी, घोंगडी, चादरी व चटया यासारखे अंथरूण पांघरूण, दररोजच्या वापरातील

कपडे व एखादी पत्र्याची किंवा लाकडी पेटी इतकेच साहित्य असते. मौल्यवान व किंमती वस्तू किंवा दागिने त्यांच्याकडे नसतात. सर्वेक्षणासाठी निवडलेल्या खेड्यात या ऊस तोड कामगारांच्या झोपड्यांना भेटी दिल्या. परंतु त्यांच्या झोपड्यामध्ये रेडिओ किंवा फर्निचर आढळून आले नाही.

त्यांच्याकडील एकमेव मौलिक मालमत्ता म्हणजे बरोबर आणलेली जनावरे हीच होय. ऊस तोड कामगार कामावर येताना बरोबर शेळ्या, गाई, म्हैस व बैल घेऊन येत असतात. गाडीवान ऊस तोड कामगारांच्या कडील बैलजोडी व बैलगाडी (स्वत:ची असल्यास) ही महत्वाची मालमत्ता होय. कोष्टक क्रमांक ४.१० मध्ये जनावरांच्या मालकी विषयीची माहिती दिली आहे.

कोष्टक क्र. ४.१०

जनावरांच्या मालकीनुसार उत्तरदात्यांचे वर्गीकरण

| | जनावरे नसणाऱ्या कुटुंबांची संख्या | गाय, म्हैस, बैल, शेळ्या यासारखी जनावरे असणाऱ्या कुटुंबांची संख्या | एकूण |
|---|---|---|---|
| | २७ | ६३ | ९० |
| शेकडा प्रमाण | ३० | ७० | १०० |

एकूण उत्तरदात्यांपैकी २७ (३० टक्के) उत्तरदाते असे आहेत की, त्यांच्याकडे कोणतेच जनावर नाही. तसेच एकूण ऊस तोड कामगार कुटुंबापैकी ७० टक्के कुटुंबांच्याकडे गाय, म्हैस, बैल, शेळ्या इत्यादी जनावरे आहेत. ही जनावरे मुख्यत: दूध देणारी असून दुधाचा वापर चहासाठी व लहान मुलांसाठी केला जातो. जनावरे बरोबर आणण्याचे महत्वाचे उद्देश म्हणजे मूळगावी पुरेसा चारा नसतो. कामाच्या ठिकाणी ऊसाच्या वाड्यावर जनावरे फुकट

पोसता येतात. शिवाय मूळगांवी जनावरांची व्यवस्था कोण पाहणार हाही प्रश्न असतो. मुख्यत: मूळगांवी चा-याचा प्रश्न असल्यानेच जनावरे बरोबर आणली जातात असे बहुतेक उत्तरदात्यांनी सांगितले.

४.३.६ उपभोग्य वस्तू खरेदीचे मार्ग -

उपभोक्त्यांच्या राहणीमानाची पातळी ही प्रामुख्याने उपभोग्य वस्तूंच्या किंमतीवर व उत्पन्नावर अवलंबून असते. सर्वसाधारणपणे उपभोग्य वस्तूंची खरेदी नियंत्रित दराच्या दुकानातून व सहकारी ग्राहक भांडारातून होत असेल तर त्या वस्तू वाजवी किंमतीत उपलब्ध होतात. उपभोग्य वस्तूंची खरेदी खुल्या बाजारातून करावी लागत असेल तर अधिक किंमत द्यावी लागते. सर्वेक्षणातील प्रश्नावलीमध्ये ऊस तोड कामगारांच्या पुढे उपभोग्य वस्तू खरेदीचे पाच मार्ग ठेवले होते. त्यास त्यांनी दिलेल्या उत्तरांचे वर्गीकरण कोष्टक क्रमांक ४.११ मध्ये केलेले आहे.

कोष्टक क्र. ४.११

उपभोग्य वस्तूंच्या खरेदीच्या मार्गानुसार उत्तरदात्यांचे वर्गीकरण

| अनु. | खरेदीचा मार्ग | कुटुंबाची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | स्वस्त धान्य दुकान व खुला बाजार | १० | ११.१२ |
| २) | केवळ खुला बाजार | ६० | ६६.६६ |
| ३) | कंत्राटदार व खुल्या बाजारातून | २० | २२.२२ |
| ४) | कारखान्याकडून | - | - |
| ५) | सहकारी ग्राहक भांडारातून | - | - |
| | एकूण : | ९० | १००.०० |

जी १० स्थानिक ऊस. तोड कामगार कुटुंबे आहेत तीच फक्त स्वस्त धान्य दुकानातून धान्य खरेदी करू शकतात व त्याच बरोबर किराणा माल त्यांना खुल्या बाजारातून खरेदी करावा लागतो. अशा कुटुंबांचे एकूण कुटुंबाशी प्रमाण ११.१२ टक्के इतके आहे. खुल्या बाजारातून उपभोग्य वस्तू खरेदी करणाऱ्या कुटुंबांची संख्या सर्वाधिक असून त्यांचे एकूण कुटुंबांशी असणारे प्रमाण ६६.६६ टक्के इतके आहे. स्थलांतरीत कामगारांना स्वस्त धान्य दुकानातून उपभोग्य वस्तू मिळू शकत नाहीत. कंत्राटदारांच्याकडून ज्वारी व गहू यासारखे धान्य खरेदी करता येते. कंत्राटदार व खुल्या बाजारातून धान्य खरेदी करणाऱ्या कुटुंबांची संख्या २० इतकी असून त्यांचे एकूण कुटुंबाशी असणारे प्रमाण २२.२२ टक्के इतके आहे. कारखाना धान्य किंवा इतर उपभोग्य वस्तू पुरविण्याची जबाबदारी स्वीकारीत नाही. तसेच या ऊस तोड कामगारांची सहकारी ग्राहक भांडारे नसतात. त्यामुळे कारखाना किंवा सहकारी ग्राहक भांडारे यांच्याकडून वस्तू मिळू शकत नाहीत. परिणामी उपभोग्य वस्तू प्रामुख्याने खुल्या बाजारातून अधिक किंमतीस खरेदी कराव्या लागतात.

४.३.७ कर्जबाजारीपणा -

सर्वेक्षणामध्ये एकूण कामगार कुटुंबापैकी निम्म्यापेक्षा अधिक कामगार कुटुंबे कर्जबाजारी असल्याचे आढळून आले. या कामगारांची कर्जे दोन प्रकारची असल्याचे आढळते. काही कामगार ऊस गळीत हंगामाच्या सुरुवातीस कंत्राटदारांच्याकडून ' उचल ' या स्वरूपात कर्ज घेत असतात. हे कर्ज तारणाशिवाय मिळते. परंतु कामाच्या बिलातून त्याच गळीत हंगामात कर्जाची परतफेड करावी लागते. या कर्जावर व्याज आकारले जात नाही. परंतु चालू गळीत हंगामामध्ये कर्जफेड केली नाही, तर शिल्लक राहिलेल्या कर्जावर व्याज आकारले जाते. बैलगाडीवान स्वतःच कंत्राटदार असल्यामुळे बैलगाडीवानांना कारखान्याकडून बैलजोडी व बैलगाडी खरेदी करण्यासाठी वरील स्वरूपाची कर्जे मिळू शकतात. त्यामुळे बैलगाडीवानांना स्वतः भांडवल गुंतवणूक करावी लागत नाही. बैलजोडी

किंवा बैलगाडी खरेदीसाठी घेतलेल्या कर्जाची परतफेड वेतन बिलातून प्रतिवर्षी एकूण कर्जाच्या २० टक्के याप्रमाणे पाच वर्षात करावयाची असते.

दुसऱ्या प्रकारची कर्जे म्हणजे, ऊस तोड कामगारांनी त्यांच्या मूळगावी घेतलेली कर्जे होत. त्यानी आपल्या मूळगावी कर्जे, कोणाकडून व किती प्रमाणात घेतली आहेत, कर्जाची कारणे व तारण याविषयीची माहिती पुढीलप्रमाणे आहे.

<u>कोष्टक क्र. ४.१२</u>

कर्जबाजारीपणा व कर्जपरतफेडीच्या प्रमाणानुसार वर्गीकरण

| तपशील | कुटुंबाची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| कर्जबाजारीपणा नाही. | ४३ | ४७.७७ |
| कर्जबाजारीपणा आहे. | ४७ | ५२.२३ |
| कर्जपरतफेड झाली. | १ | २.१३ |
| कर्जपरतफेड झालेली नाही. | ४६ | ९७.८७ |
| एकुण : | ४७ | १००.०० |

कोष्टक क्रमांक ४.१२ मध्ये दाखविल्याप्रमाणे एकूण ऊस तोड कामगार कुटुंबापैकी ४३ (४७.७७ टक्के) कुटुंबानी कोणत्याच प्रकारची कर्जे घेतलेली नाहीत तर ४७ (५२.२३ टक्के) कुटुंबानी कर्जे घेतलेली आहेत. म्हणजे निम्म्यापेक्षा अधिक कुटुंबे कर्जबाजारी आहेत. तसेच कर्जाची परतफेड जवळजवळ झालेली नाही. एकूण कर्जदार कुटुंबापैकी फक्त एका कुटुंबाने (२.१३ टक्के) कर्जफेड केलेली आहे व

१७.८७ टक्के कर्जदाराकडून कर्जफेड झालेली नाही. `उचल` स्वरूपाची कर्जे त्या त्या हंगामामध्ये वेतन रकमेतून परत होण्याची शक्यता अधिक असते.

कोष्टक क्र. ४.१३

कर्जमागणीच्या कारणावरून उत्तरदात्यांचे वर्गीकरण

| कर्ज मागणीचे कारण | उत्तरदात्यांच्या उत्तरांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| लग्न समारंभ | १० | ९.६२ |
| घरगुती दैनंदिन खर्च | ३२ | ३०.७७ |
| अपुरे वेतन | २८ | २६.९२ |
| कामाची हत्यारे, बैलजोडी खरेदी | १४ | १३.४७ |
| वडिलोपार्जित कर्जफेड | २ | १.९२ |
| सामाजिक चालिरिती (सण, उत्सव) | २ | १.९२ |
| आजारपण | १ | ०.९५ |
| आर्थिक सुधारणा (जमीन सुधारणा व धरबांधणी) | १५ | १४.४३ |
| एकूण : | १०४ | १००.०० |

टीप : उत्तरदात्यांनी कर्जमागणीच्या एकापेक्षा अधिक कारणांना होकारार्थी उत्तरे दिलेली आहेत, त्यामुळे उत्तरांची संख्या कर्जदार उत्तरदात्यांच्या संख्येपेक्षा अधिक येते.

ऊस तोड कामगारांनी घेतलेली बहुतेक कर्जे अनुत्पादक असल्याचे आढळते. प्रामुख्याने अपुरे वेतन व घरगुती दैनंदिन खर्च भागविणे या दोन कारणांसाठी कर्ज घेतलेल्या कर्जदारांचे प्रमाण जास्त असून एकूणांशी प्रमाण ५७.६९ टक्के इतके आहे. त्याच्या खालोखाल मूळगांवी जमीन सुधारणा व घरबांधणीसाठी कर्जे घेतलेल्या कर्जदारांचे प्रमाण १४.४३ टक्के इतके आहे. त्यानंतर कामाची हत्यारे, बैलगाडी व बैलजोडी खरेदी या हेतूने कर्जे घेतलेल्या कर्जदारांचे प्रमाण १३.४७ टक्के, लग्न समारंभाच्या हेतूने ९.६२ टक्के व वडिलोपार्जित कर्जफेडीसाठी १.९२ टक्के, सण,उत्सव व साजरे करणे या सामाजिक चालिरितीच्या हेतूने १.९२ टक्के व आजारपणासाठी ०.९५ टक्के इतके आहे.

कोष्टक क्र. ४.१४

कर्जाचा मार्ग व कर्जतारण प्रकारानुसार
उत्तरदात्यांचे वर्गीकरण

| कर्जाचा मार्ग | कुटुंबाची संख्या | शेकडा प्रमाण | तारण प्रकार | कुटुंबाची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| कंत्राटदार | १५ | ३१.९१ | व्यक्तिगत पत | २४ | ५१.०७ |
| सावकार | १८ | ३८.३० | सरकारी योजनांतर्गत | ४ | ८.५० |
| बँका | १० | २१.२८ | जमीन | १५ | ३१.९१ |
| सहकारी सोसायटी | ४ | ८.५१ | पीक तारण | ४ | ८.५० |
| एकूण : | ४७ | १००.०० | - | ४७ | १००.०० |

ऊस तोड कामगारांनी घेतलेल्या कर्जांचे प्रमाण किती आहे, किती हजार रुपयांपर्यन्त कर्जे घेतली आहेत याविषयीची माहिती सर्वेक्षणातून घेतलेली नाही. त्यामुळे येथे कर्ज रकमा दिलेल्या नाहीत. कंत्राटदारांच्याकडून कर्ज घेणाऱ्यांचे प्रमाण ३१.९१ टक्के इतके आहे, सावरकारांच्याकडून ३८.३० टक्के, बँकाकडून २१.२८ टक्के व सहकारी सोसायटीकडून ८.५१ टक्के कर्जे घेतली आहेत. कोष्टक क्रमांक ४.१४ वरून हेही स्पष्ट होते की व्यक्तिगत पत या तारण प्रकारानुसार घेतलेल्या कर्जाचे प्रमाण ५१.०७ इतके आहे, तसेच सरकारी योजनांतर्गत ८.५०, जमिनीच्या तारणावर ३१.९१ टक्के व पीक तारणावर ८.५० टक्के इतक्या कर्जे घेतली आहेत.

सर्वेक्षणामध्ये . उत्तरदात्यांच्याकडून मिळालेल्या माहितीनुसार ५३.२३ टक्के इतकी कुटुंबे कर्जबाजारी आहेत. परंतु कंत्राटदारांच्याकडून मिळालेल्या माहितीनुसार असे समजते की, जवळ जवळ सर्वच ऊस तोड कामगार कुटुंबे कर्जबाजारी असतात. कारण गळीत हंगामाच्या सुरूवातीस कंत्राटदाराकडून प्रत्येक कोयत्या पाठीमागे १००० रूपये ते २००० रूपये पर्यन्त उचल दिली जात असते. गळीत हंगाम संपेपर्यन्त तो कामगार ऊस तोडणीच्या कामाशी बांधील रहावा म्हणून सुरूवातीसच त्यास उचल दिली जात असते.

कर्जाची परतफेड वेळच्यावेळी होत नाही. त्यांच्या कर्जाच्या परतफेडीचे मार्ग म्हणजे ऊस तोडणीच्या कामाच्या मोबदल्यातून राहिलेली शिल्लक व भूधारक कामगारांच्या शेतीतील मिळालेले उत्पन्न हे होत. परंतु या मार्गाने त्यांची कर्जाची परतफेड होऊ शकत नाही. कंत्राटदाराकडून घेतलेली कर्जे कामाच्या मोबदल्यातून परत करावयाची असतात. परंतु त्याच गळीत हंगामामध्ये संपूर्ण कर्जाची परतफेड होऊ शकत नाही. म्हणून पाठीमागचे राहिलेले कर्ज फेडण्यासाठी पुन्हा पुढच्या गळीत हंगामास ऊस तोडणच्या कामासाठी यावे लागते, पुन्हा त्याच्या पुढत्या गळीत हंगामाच्यावेळी यावे लागते म्हणजे तो कर्जबाजारीपणाच्या चक्रात सापडला असल्याने कंत्राटदारांचा तो जवळ जवळ गुलामच होतो.

दुसरे कारण म्हणजे हे कामगार जेथून स्थलांतरीत झालेले आहेत, तो दुष्काळी प्रदेश आहे. त्यांच्या जमिनी नापीक आहेत, त्यामुळे शेतीतून मिळणारे उत्पादन अल्प आहे. शेतीतून मिळालेले उत्पादन वर्षभरच्या उदरनिर्वाहासाठी वापरले जाते. त्यामुळे शेती उत्पन्नातूनही ते कर्जाची परतफेड करू शकत नाहीत. अशी सर्वसाधारण स्थिती दिसते. ज्यांच्याकडे जनावरे आहेत असे कामगार वर्षातून एखादे वेळेस शेळीचा बोकड विकून व दोन ते चार वर्षातून एखादे वेळेस गाईचा खोंड विकून काही प्रमाणात कर्जफेड करू शकतात.

## ४.४ राहण्याची व्यवस्था, शिक्षण व आरोग्यविषयक स्थिती :

ऊस तोड कामगारांच्या नमुना पाहणीसाठी वापरलेल्या प्रश्नावली-तील चवथ्या विभागात राहण्याची व्यवस्था, मुलांची शिक्षण व्यवस्था, आरोग्य व कुटुंब नियोजन विषयक प्रश्न विचारून जी माहिती एकत्रित केली आहे त्याच्या आधारावर या उपविभागात ऊस तोड कामगारांची कामाच्या ठिकाणी व मूळगावी राहण्याची व्यवस्था, शिक्षण, आरोग्य व कुटुंबनियोजनविषयक दृष्टिकोन याविषयीच्या सद्य:स्थितीच्या वास्तवतेचे वर्णन केले आहे.

### ४.४.१ राहण्याची (घराची) व्यवस्था -

ऊस तोड कामगार कुटुंबाचे राहणीमान हे अत्यंत निकृष्ठ दर्जाचे आहे. आहार तर निकृष्ट आहेच, पण अंगावरती पुरेशी कपडेही वापरण्यासाठी नसतात. राहत्या घराची व्यवस्था तर त्याहून बिकट असते. कामाच्या ठिकाणी हे कामगार बांबू, चिवटया, तट्टया किंवा ऊसाचा पाला यापासून बनविलेल्या झोपडीमध्ये राहतात. पक्के बांधकाम असणा-या किंवा माडयाच्या घरात ते राहत नाहीत. तसेच ते गावात राहत नाहीत तर ऊस तोडणीच्या कामास नजीक असणा-या मोकळ्या शेतात कोठेही झोपडया उभारून राहतात. त्यांना

जागेचा प्रश्न नसतो. कारण त्यांच्या बरोबर जी जनावरे असतात, त्या जनावरांचे शेणखत व मुतारा यामुळे जमीन खतावते, म्हणून कोणी ही शेतकरी, त्यांची मोकळी जमीन राहण्यासाठी देतात. प्रत्यक्ष निरीक्षणातून सर्वसाधारण-पणे असे आढळून आले की, कामाचे ठिकाण व गाव नजीक आहे, जेथे पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आहे, अशा ठिकाणी ते रहात असतात.

झोपड्या अत्यंत लहान असतात. झोपडीचा आत सर्वसाधारणपणे ५ फूट बाय ५ फूट जागेची कमी उंचीची एकच खोली असते. बैठक खोली, स्वयंपाक खोली अशी व्यवस्था नसते. त्या खोलीचा वापर केवळ साहित्य ठेवण्यासाठीच होतो. रात्री कुटुंबातील सर्व सदस्यही त्या झोपडीत झोपू शकत नाहीत. केवळ लहान मुले व स्त्रिया झोपडीत झोपत असाव्यात. पुरूष उघड्यावरच झोपडीच्या बाहेर झोपतात. स्वयंपाक झोपडीच्या बाहेर तीन दगडाच्या चुलीवर केला जातो. पिण्याचे पाणी, पत्र्याच्या घागरीमध्येच ठेवलेले असते. तेथे संडास, मुतारी व स्नानगृहाची व्यवस्था नसते. राहते घर व घरातील व्यवस्था याबाबत प्रत्यक्ष निरीक्षणातून खालील गोष्टी निदर्शनास आल्या :

१) संडास, मुतारी व स्वतंत्र स्नानगृहाची व्यवस्था नसते. स्त्रियाही उघड्यावरच स्नान करीत असतात.

२) पिण्याचे पाणी नजीकची विहिर, कूपनलिकेवरील हापसा व पाईपलाईनच्या चेंबरवरून घागरीने वाहून आणावे लागते.

३) स्वयंपाकासाठी इंधन म्हणून वाळलेले ऊस, झाडाच्या वाळलेल्या फांद्या व काटक्या, पालापाचोळा वापरतात.

४) झोपडीमध्ये विजेचे दिवे नसतातच, रॉकेलच्या चिमण्याही उघड्यावर वाऱ्यात राहू शकत नाहीत. म्हणून स्वयंपाक शक्यतो सूर्यप्रकाशअसतानाच केला जातो. चुलीतील ज्वालांच्या प्रकाशामध्येच जेवण केले जाते.

५) टोळीतील सर्व कामगारांच्या झोपडया एकाच ठिकाणी बांधलेल्या असतात. झोपडया बांधण्याची सर्वसाधारणपणे रचना अशी असते की, समोवार किंवा वर्तुळाकार झोपडया बांधून सर्व झोपडयांच्यामध्ये मोकळी जागा ठेवतात. त्या जागेमध्ये रात्री शेळ्या व इतर जनावरे बांधली जातात. त्यामुळे रात्रीचे त्यांचे संरक्षण होते. झोपडीचा आकार, झोपडीतील साहित्य, सर्व झोपडयांची एकत्रित बांधणीची रचना व झोपडी समोर तीन दगडाच्या चुलीवर ऊस तोड कामगारांच्या स्त्रिया स्वयंपाक कशा करतात याचे वास्तव चित्र स्पष्ट करणारे काही फोटो पुढील पानावर आहेत.

ऊस तोड कामगारांची कामाच्या ठिकाणच्या राहण्याच्या व्यवस्थे-पेक्षा मूळ गावची राहण्याची व्यवस्था फारशी वेगळी असल्याचे आढळून आले नाही. कारण स्थानिक व स्थलांतरीत कामगारांचा एकत्रित विचार करता ५८.८९ टक्के कामगार कुटुंबे त्यांच्या मूळगांवीही पाल्याचे छप्पर असणाऱ्या घरामध्येच राहतात असे आढळून आले. मूळगावच्या घराच्या स्वरूपानुसार ऊस तोड कामगार कुटुंबाचे वर्गीकरण कोष्टक क्रमांक ४.१५ मध्ये दाखविल्या प्रमाणे आहे.



ोपड्यांची रचना



ोपडीतील साहित्य



स्वयंपाक करताना

कोष्टक क्र. ४.१५

स्थानिक व स्थलांतरीत कामगारांच्या मूळगावच्या राहत्या घराच्या स्वरूपानुसार वर्गीकरण

| घराचे स्वरूप | स्थानिक कुटुंबाची संख्या | स्थलांतरीत कुटुंबाची संख्या | एकूण संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १) मातीचे बांधकाम व पाल्याचे छप्पर | ३ | ५० | ५३ | ५८.८९ |
| २) मातीचे बांधकाम व धाब्याचे छप्पर | १ | १८ | १९ | २१.१२ |
| ३) मातीचे बांधकाम व कौलारू छप्पर | ६ | २ | ८ | ८.८९ |
| ४) मातीचे बांधकाम व पत्र्याचे छप्पर | - | ४ | ४ | ४.४४ |
| ५) माडयाचे घर | - | ४ | ४ | ४.४४ |
| ६) घरकुल योजनांतर्गत मिळालेले घर | - | २ | २ | २.२२ |
| एकूण : | १० | ८० | ९० | १००.०० |

एकूण उत्तरदात्यांपैकी ५८.८९ टक्के उत्तरदाते त्यांच्या मूळगावीही पाल्याच्या छपरामध्येच राहत आहेत. या घराच्या भींती दगडाच्या परंतु मातीत बांधलेल्या आहेत. धाब्याच्या घरामध्ये राहणाऱ्यांचे प्रमाण २१.१२ टक्के इतके आहे. तसेच मातीच्या भींती व वरती कौलारू छप्पर असणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण ८.८९ टक्के इतके आहे, तर पत्र्याचे छप्पर असणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण ४.४४ टक्के इतके आहे. माडयाच्या घरामध्ये राहणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण ४.४४

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.
SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

टक्के इतके आहे. घरकुल योजनेखाली मिळालेल्या घरामध्ये राहणाऱ्यांची संख्या फक्त २ इतकी असून त्यांचे एकूणांशी प्रमाण २.२२ टक्के इतकेच आहे.

स्थलांतरीत ऊस तोड कामगार कुटुंबे ऊस तोडणीच्या कामावर आल्यानंतर त्यांच्या मूळगावच्या घराची व्यवस्था कोण पाहते, याविषयीही माहिती सर्वेक्षणातून मिळविलेली आहे. एकूण स्थलांतरीत कुटुंबापैकी ७५ कुटुंबे अशी आहेत की, त्यांच्या मूळगावच्या घरी वृध्द आई वडील, शाळेला जाणारी मुले, किंवा एखाद्या कामगाराची पत्नी व एकत्र कुटुंब असल्यास भाऊ, भावजई, भावाची मुले यापैकी कोणीतरी राहत असते. तेव्हा कुटुंबातील मूळगावी राहणारे जे कोणी सदस्य असतील त्यांच्याकडून त्या घराची व्यवस्था ठेवली जाते. तसेच एकूण कुटुंबापैकी ५ स्थलांतरीत कुटुंबे अशी आहेत की, त्यांच्या मूळगावच्या घरात कोणीही रहात नसून ते घरे बंद करून आलेले आहेत.

४.४.२ <u>शिक्षण</u> -

ऊस तोड कामगारांची परिचयात्मक माहिती यामध्ये ऊस तोड कामगारांचा शैक्षणिक दर्जा याविषयी माहिती दिली आहे. या उपविभागात ऊस तोड कामगारांच्या मुलांच्या शिक्षणविषयक स्थिती काय आहे, त्यांची मुले शाळेस जातात का ? जात नसल्यास का जात नाहीत ? याविषयी माहिती सर्वेक्षणातून मिळविलेली आहे. सर्वेक्षणामध्ये असे आढळून आले की, एकूण उत्तरदात्या कुटुंबापैकी ५१ कुटुंबातील म्हणजे ५६.६७ टक्के कुटुंबातील मुले शाळेस जातात, तर ३९ कुटुंबातील म्हणजे ४३.३३ कुटुंबातील मुले शाळेस जात नाहीत. शाळेस जाणारी सर्वांच्या सर्व म्हणजे १०० टक्के मुले ही त्यांच्या मूळगावच्या शाळेतच जातात. कामाच्या ठिकाणच्या शाळेत एकाही कुटुंबातील मुले जात नाहीत. याविषयी माहिती कोष्टक क्रमांक ४.१६ मध्ये दिलेली आहे.

कोष्टक क्र. ४.१६

मुलींच्या शिक्षण सोयीप्रमाणे उत्तरदात्यांचे वर्गीकरण

| तपशील | कुटुंबाची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| मुले शाळेस पाठवतात | ५१ | ५६.६७ |
| मुले शाळेस पाठवित नाहीत | ३९ | ४३.३३ |
| मुले गावच्या शाळेस जातात | ५१ | १००.०० |
| मुले कामाच्या ठिकाणच्या शाळेत जातात | ०० | - |

कोष्टक क्र. ४.१७

मुले शाळेस न पाठविण्याच्या कारणानुसार उत्तरदात्यांचे वर्गीकरण

| मुले शाळेस न पाठविण्याची कारणे | उत्तरदात्यांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| मुले कामास मदत करतात | ७ | १७.९५ |
| लहान भावंडांना सांभाळतात | १५ | ३८.४६ |
| शाळा दूर आहे | - | - |
| शाळेची फी परवडत नाही | - | - |
| मुले लहान आहेत | ३ | ७.७० |
| मुले नाहीत | १४ | ३५.८९ |
| एकूण : | ३९ | १००.०० |

मुले शाळेस न पाठविण्याचे महत्वाचे कारण म्हणजे ती लहान भावंडांना सांभाळतात. कामाच्या ठिकाणी घराची व आहाराची समस्या असल्याने कुटुंबातील वृध्द सदस्यांना ते बरोबर घेऊन येऊ शकत नाहीत. त्यामुळे लहान मुलांना सांभाळणी ही एक महत्वाची गरज असते. अशावेळी मोठया मुलांना शाळेस पाठविण्याऐवजी त्याना त्यांच्या लहान भावंडांच्या संगोपनाचे काम लावले जाते. या कारणासाठी मुलांना शाळेस न पाठवणाऱ्या कुटुंबांची संख्या ३८.४६ टक्के इतके आहे. तसेच ऊस तोडणीच्या कामास मुले मदत करतात म्हणून शाळेस न पाठविणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण १७.९५ टक्के इतके आहे. तसेच नवविवाहित दांपत्ये व अन्य काही कुटुंबामध्ये मुलेच नाहीत, अशा कुटुंबांचे प्रमाण ३५.८९ टक्के इतके आहे. मुले लहान असल्यामुळे शाळेस जाऊ शकत नाहीत अशा कुटुंबांचे प्रमाण ७.७० इतके आहे. वरील काही कारणामुळे मुले शाळेस पाठविली जात नसली तरी मुले शाळेस पाठविणाऱ्या कुटुंबांची संख्याच जास्त आहे. सततचा दुष्काळ व गरीबी यामुळे आपल्या मुलांना शिक्षणाशिवाय आर्थिक प्रगतीचा दुसरा मार्ग नाही, याची जाणीव या ऊस तोड कामगारांना झालेली असावी. यामुळेच मुले शाळेस पाठविण्याचे प्रमाण ५० टक्के पेक्षा अधिक असावे.

ऊस तोड कामगारांच्या व त्यांच्या मुलांच्या शिक्षणाबाबत सर्वसाधारण स्थिती खालील प्रकारची आढळून येते.

१) ऊस तोड कामगारांच्यामध्ये साक्षरतेचे प्रमाण अल्प असून ते ३३.३३ टक्के इतकेच आहे.
२) ऊस तोड कामगारांच्यामध्ये निरक्षरांचे प्रमाण जास्त असूनही ते प्रौढ शिक्षण वर्गात जात नाहीत असे आढळून आले.
३) ऊस तोड कामगारांच्यामध्ये निरक्षराचे प्रमाण जास्त असूनही ते मुलांना शाळेस पाठविण्याचे प्रमाण त्यांच्यात अधिक आहे. एकूण कुटुंबापैकी ५६.६७ टक्के कुटुंबे स्वत:ची मुले शाळेस पाठवित आहेत.

४) मुलांच्या शिक्षणासाठी कारखान्याकडून कोणत्याही प्रकारचे अर्थसहाय्य मिळत नाही.

५) ऊस तोड कामगार स्वत:ची मुले त्यांच्या मूळगावच्या शाळेतच पाठवितात. मुलांना कामाच्या ठिकाणच्या शाळेत पाठविणारे एकही कुटुंब सर्वेक्षणात आढळून आले नाही.

६) जी ऊस तोड कामगार कुटुंबे आपल्या मुलांना शाळेस पाठवित नाहीत त्यांची महत्वाची कारणे म्हणजे ती मुले आपल्या लहान भावंडांना सांभाळणे व कामास मदत करणे ही होत.

४.४.४ <u>सामाजिक जीवन व सवयी</u> -

या विभागामध्ये ऊस तोड कामगारांचे सामाजिक जीवन व त्यांच्या सवयी याविषयी माहिती दिलेली आहे. हे कामगार निरक्षर व अज्ञानी असल्यामुळे पेपर वाचणे, रेडिओ ऐकणे, खेळ खेळणे यासारख्या सवयी त्यांना नाहीत. शारीरिक कष्टाची कामे करावी लागत असल्याने व्यायामासाठी खेळ खेळण्याची वगैरे गरज भासत नाही. तसेच सिनेमा पाहण्याचीही सवय या लोकांना असलेली आढळून आली नाही. यांचा संबंध ऊस उत्पादन भागाशी म्हणजे ग्रामीण भागाशी येत असल्याने ग्रामीण भागात सिनेमागृहांची सोय नसते. शहरी भागाच्या नजिक काम करणाऱ्या कामगारांना काही प्रमाणात सिनेमा पाहण्याची सवय असल्याचे आढळते.

एकूण उत्तरदात्यांपैकी फक्त सात उत्तरदाते म्हणजे ७.७७ टक्के उत्तरदाते महिन्यातून एक वेळेस चित्रपटगृहास भेट देतात असे आढळून आले, तर ९२.३३ टक्के उत्तरदात्यांनी चित्रपटगृहास एकवेळही भेट दिलेली नाही. परंतु सण, उत्सव, गावची जत्रा व लग्नकार्य यासारख्या सामाजिक कार्यक्रमात भाग घेणाऱ्यांचे प्रमाण १०० टक्के आहे असे आढळून आले.

कोष्टक क्र. ४.१८

ऊस तोड कामगारांचे सवयीनुसार वर्गीकरण

| सवयी | होय | नाही |
|---|---|---|
| पान | ४० (४४.४४) | ५० (५५.५६) |
| तंबाखु | ८२ (९१.११) | ८ ( ८.८९) |
| चहा | ५५ (६१.११) | ३५ (३८.८९) |
| दारू | १६ (१७.७७) | ७४ (८२.२३) |
| बीडी | ८ ( ८.८९) | ८२ (९१.११) |

टीप : कंसातील आकडे प्रतिशत प्रमाण दर्शवितात.

ऊस तोड कामगारांच्या सवयीच्या प्रमाणानुसार वर्गीकरण कोष्टक क्रमांक ४.१८ मध्ये दिलेले आहे. तंबाखु खाण्याचे प्रमाण या कामगारांच्यामध्ये अधिक प्रमाणात आढळून आले. तसेच स्त्री कामगार सुध्दा काही प्रमाणात तंबाखु खाताना दिसून आल्या. तसेच स्त्री कामगार तंबाखुची मिश्री दातांना लावताना पाहिले. एकूण उत्तरदात्याच्या ९१.११ टक्के इतके तंबाखु खाण्याचे प्रमाण आहे. पान खाणाऱ्यांचे प्रमाण ४४.४४ टक्के इतके आहे. दररोज सकाळी चहा पिणाऱ्यांचे प्रमाण ६१.११ टक्के इतके आहे. चहा पिण्याचे प्रमाण उत्तरदात्यांच्यामध्ये १०० टक्के नसले तरी त्यांच्या कुटुंबातील अन्य सदस्य चहा पिणारे आहेत. बीडी ओढणाऱ्यांचे प्रमाण ८.८९ टक्के इतके आहे. देशी दारू पिणाऱ्यांचे प्रमाण १७.७७ टक्के इतके आढळून आले. परंतु कंत्राटदारांच्या मते जवळजवळ सर्वच ऊसतोड कामगार देशी दारू पीत असतात. उत्तरदात्यांना केवळ एकच व्यसन नसून ते एकापेक्षा अधिक व्यसनांच्या अधीन झालेले दिसून येतात.

### ४.४.५ आरोग्य व कुटुंब नियोजन विषयक माहिती -

या सर्वेक्षणामध्ये ऊस तोड कामगारांना आरोग्यविषयक सुविधा कोठून उपलब्ध होतात ? त्यांची कुटुंब नियोजन विषयक मते काय आहेत ? याविषयीही माहिती जमा केली आहे. या माहितीच्या आधारावरच त्यांचे आरोग्य व कुटुंब नियोजन विषयक स्थितीचे वर्णन केले आहे. या कामगारांना सतत उन्हात व थंडीत काम करावे लागते, निवारा व कपडे पुरेशी नसतात यामुळे थंडी, ताप, हगवण, मलेरिया, खोकला यासारख्या किरकोळ आजारांना नेहमीच तोंड द्यावे लागते. तेव्हा सर्वेक्षणामध्ये असे आढळून आले की, गरजेनुसार दवाखान्यात जाऊन औषध घेणाऱ्यांचे प्रमाण १०० टक्के इतके आहे. ते दवाखान्यात अजिबात जात नाहीत असे आढळून आले नाही. औषधोपचारासाठी या कामगारांना खाजगी दवाखान्यातच जास्त प्रमाणात जावे लागते. कारखान्याकडून औषधोपचार पुरविले जात नाहीत. तसेच हे कामगार खेड्यात काम करीत असतात. खेड्यामध्ये सार्वजनिक प्राथमिक आरोग्य केंद्राची सोय असतेच असे नाही. त्यामुळे सर्वेक्षणात असे आढळून आले की केवळ स्थानिक कामगारच सार्वजनिक प्राथमिक आरोग्य केंद्रात जाऊन औषधे घेऊ शकतात. त्यामुळे एकूण उत्तरदात्यांच्या ११.११ टक्के उत्तरदाते सार्वजनिक प्राथमिक आरोग्य केंद्रातून व ८८.८९ टक्के उत्तरदाते खाजगी दवाखान्यातून औषधोपचार घेत असल्याचे आढळून आले.

स्त्री कामगारांना त्यांच्या गरोदरपण व बाळंतपण या काळात आरोग्यविषयक कोणत्या सोयी उपलब्ध होतात या विषयीचे वर्णन कोष्टक क्रमांक ४.१९ मधील आकडेवारी नुसार केलेले आहे. एकूण ऊस तोड कामगार कुटुंबापैकी ८१.११ टक्के कुटुंबातील स्त्रिया गरोदरपणात वैद्यकीय तपासणी करून घेतात असे आढळून आले. गर्भाची वाढ योग्य व्हावी यासाठी सकस आहाराची गरज असते. गरोदरपणाच्या काळात सकस आहार न घेणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण १०० टक्के आहे. गरोदरपणात कोणत्याच प्रकारची काळजी

कोष्टक क्र. ४.१९

स्त्रियांचे गरोदरपण व बाळंतपण या काळातील आरोग्यविषयक स्थिती

| तपशील | होय | नाही |
|---|---|---|
| **स्त्रियांचे बाळंतपण -** | | |
| दवाखान्यात | १० (११.११) | ८० (८८.८९) |
| घरी सुईणीच्या मदतीने | ८० (८८.८९) | १० (११.११) |
| **गरोदरपणातील काळजी -** | | |
| वैद्यकीय तपासणी | ७३ (८१.११) | १७ (१८.८९) |
| सकस आहार | - - | ९० (१००.००) |
| घरगुती उपचार | ८५ (९४.४५) | ५ (५.५५) |
| कोणतीही नाही | - - | ९० (१००.००) |

टीप : कंसातील आकडे टक्केवारी दर्शवितात.

घेतली जात नाही, अशी स्थिती नसली तरी जवळजवळ ९४.४५ टक्के स्त्रिया गरोदरपणात घरगुती उपचारच घेतात असे आढळून आले. एकंदरीत घरगुती उपचारावर अधिक भर आहे. एकूण ऊस तोड कामगार कुटुंबापैकी ८८.८९ टक्के कुटुंबातील स्त्रियांचे बाळंतपण घरी सुईणीच्या मदतीने होत असून केवळ ११.११ टक्के स्त्रियाच बाळंतपणासाठी दवाखान्यात जातात. यावरून आपणास सर्वसाधारणपणे असा निष्कर्ष काढणे शक्य आहे की खेड्यामध्ये सार्वजनिक प्राथमिक आरोग्य केंद्राच्या अपुऱ्या सोयी व पैशाच्या अडचणीमुळे गरोदरपण व बाळंतपण या काळात ऊस तोड कामगारांच्या स्त्रियांना घरगुती उपचारांवरच अधिक प्रमाणात अवलंबून रहावे लागते.

ग्रामीण भागातही सहा वर्षाखालील मुलांना गोवर प्रतिबंधक व त्रिगुणी लस टोचून घेतली जाते असे आढळून आले. तसेच यांच्या लहान मुलांचे आरोग्य सर्वसाधारणपणे मध्यम दर्जाचे आढळून आले. कामाच्या ठिकाणी किंवा त्यांच्या झोपडयात जेव्हा जेव्हा भेट दिली, तेव्हा निदर्शनास आलेली त्यांची मुले गुटगुटीतही नव्हती व एकदम अशक्त, रोडावलेली अशीही नव्हती.

४.५.१ कुटुंबनियोजनविषयक माहिती -

सर्वेक्षणामध्ये ऊस तोड कामगारांना कुटुंब नियोजनविषयक ज्ञान आहे का ? असल्यास कुटुंब नियोजनविषयक त्यांचे मत, कुटुंब नियोजनाच्या साधनांच्या वापरासंबंधी मत, गर्भपाताविषयी मत, कुटुंब नियोजनाच्या साधनांच्या वापरास प्रतिसाद किती प्रमाणात आहे, याविषयी माहिती जमा केलेली आहे.

कोष्टक क्र. ४.२०

कुटुंबनियोजन विषयक माहिती व दृष्टिकोन

| तपशील | होय | नाही |
|---|---|---|
| कुटुंब नियोजनविषयक माहिती | ९० (१००) | - |
| कुटुंब नियोजन आवश्यक आहे | ९० (१००) | - |
| गर्भपाताविषयी होकार किंवा नकार | - | ९०(१००) |

टीप : कंसातील अंक शेकडा प्रमाण दर्शवितात.

सर्व ऊस तोड कामगारांना कुटुंब नियोजनविषयक माहिती आहे, कुटुंब नियोजनाचे त्याना ज्ञान आहे असे आढळून आले. तसेच कुटुंब नियोजन विषयक होकारार्थी मत असणाऱ्यांचे प्रमाण १०० टक्के इतके आहे, हेही कोष्टक क्रमांक ४.२० वरून स्पष्ट होते. एकाही कुटुंबाकडून कुटुंब नियोजनास विरोध झाला नाही. मात्र गर्भपातास सर्वच उत्तरदात्यांनी नकारार्थी मत नोंदविले आहे.

उत्तरदात्यांना कुटुंब नियोजनाचे ज्ञान व कुटुंब नियोजन विषयक दृष्टिकोन याबाबतचे उत्तर होकारार्थी असले तरी कुटुंब नियोजनाचा प्रत्यक्ष अवलंब मात्र फारसा झालेला दिसून येत नाही, कारण गर्भपातास विरोध करणाऱ्या उत्तरदात्यांचे प्रमाण १०० टक्के, कुटुंब नियोजन साधनांच्या वापरास विरोध करणाऱ्यांचे प्रमाण ४४.४५ टक्के तर संतती नियमन शस्त्रक्रिया न केलेल्यांचे प्रमाण ५४.४५ टक्के इतके आहे.

### कोष्टक क्र.४.२१

### कुटुंब नियोजन साधन प्रकाराच्या वापरानुसार कुटुंबांचे वर्गीकरण

| कुटुंब नियोजनाच्या साधनाचे नाव | कुटुंबांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| तांबी | ३२ | ३५.५५ |
| निरोध व संतती प्रतिबंधक गोळया | १८ | २०.०० |
| कोणतेच साधन वापरीत नाहीत | ४० | ४४.४५ |
| एकूण : | ९० | १००.०० |

कोष्टक क्र. ४.२१ मधील आकडेवारीनुसार तांबी या कुटुंब नियोजन साधनाचा वापर करणाऱ्या कुटुंबाची संख्या ३२ इतकी असून त्यांचे एकूण कुटुंबाशी प्रमाण ३४.५५ टक्के इतके आहे. निरोध व संतती प्रतिबंधक गोळ्या वापरणाऱ्यांचे प्रमाण २० टक्के इतके असून यामध्ये निरोध वापरणाऱ्यांचे प्रमाण अल्प आहे. केवळ ४ उत्तरदाते निरोध वापरीत आहेत तर १४ कुटुंबामध्ये संतती प्रतिबंधक गोळ्या घेतल्या जात असल्याचे सर्वेक्षणामध्ये सांगण्यात आले आहे. तसेच कोणत्याच प्रकारच्या साधनांचा वापर न करणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण ४४.४५ टक्के इतके आहे. सर्वप्रकारच्या कुटुंब नियोजन साधनांचा वापर करणाऱ्या कुटुंबाचे एकूण कुटुंबाशी प्रमाण ५५.५५ टक्के इतके आहे.

कोष्टक क्र. ४.२२

कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया

| कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया केंव्हा केली | कुटुंबाची संख्या | शेकडा प्रमाण |
| --- | --- | --- |
| अजून केलेली नाही | ४९ | ५४.४५ |
| पहिल्या मुलानंतर | - | - |
| दुसऱ्या मुलानंतर | ४ | ४.४४ |
| तिसऱ्या मुलानंतर | १७ | १८.८९ |
| चवथ्या मुलानंतर | १७ | १८.८९ |
| पाचव्या मुलानंतर | २ | २.२२ |
| सहाव्या मुलानंतर | १ | १.११ |
| एकूण : | ९० | १००.०० |

कौष्टक क्रमांक ४.२२ वरून हे स्पष्ट होते की, नसबंदीची शस्त्रक्रिया न करणाऱ्या उत्तरदात्यांचे प्रमाण ५४.४५ टक्के इतके आहे तर नसबंदीची शस्त्रक्रिया करून घेतलेल्यांचे प्रमाण ४५.५५ टक्के इतके आहे. तसेच नसबंदीची शस्त्रक्रिया पुरूषापेक्षा स्त्रियांनी अधिक प्रमाणात करून घेतली आहे. नसबंदीची शस्त्रक्रिया करून घेतलेल्या ४१ कुटुंबापैकी २३ स्त्रियांची व १८ पुरूषांची नसबंदी शस्त्रक्रिया झालेली आहे. केवळ एकाच मुलानंतर नसबंदीची शस्त्रक्रिया करून घेणारा एकही उत्तरदाता नाही. दुसऱ्या मुलानंतर शस्त्रक्रिया करून घेणाऱ्याचे प्रमाणही केवळ ४.४४ टक्के इतकेच आहे. तिसऱ्या व चवथ्या मुलानंतर शस्त्रक्रिया करून घेणाऱ्यांचे प्रमाण अधिक आहे. ३७.७८ टक्के उत्तरदात्यानी तिसऱ्या व चवथ्या मुलानंतर शस्त्रक्रिया करवून घेतली आहे. तसेच पाचव्या व सहाव्या मुलानंतर शस्त्रक्रिया करून घेतलेल्यांचे प्रमाण अनुक्रमे २.२२ टक्के व १.११ टक्के इतके आहे. पहिल्या ४ किंवा ५ मुलीच आहेत व मुलगा नाही म्हणूनही नसबंदीची शस्त्रक्रिया लवकर करून घेतली जात नाही असेही सर्वेक्षणामध्ये निदर्शनास आले.